दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

७० वर्ष — निर्भीड पत्रकारीतेची

बुधवार, दि. २२ जुलै २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : २०७ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये


# कर्जमाफीची पहिली यादी आज

**मुंबई (दै. संध्या)**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पत्रकार परिषदेत शेतकरी कर्जमाफी, अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित प्रदर्शन आणि दिल्लीतील सुरू असलेल्या आंदोलनांवर भूमिका मांडली. आज शेतकरी कर्जमाफीची प्राथमिक यादी जाहीर करण्याचा प्रयत्न सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच, लोकशाहीत आंदोलनाचा अधिकार असला तरी हिंसा आणि अराजकता खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

मुख्यमंत्री म्हणाले की, शेतकरी कर्जमाफीच्या अंमलबजावणीची प्रक्रिया अंतिम टप्प्यात असून उद्याच (22 जुलै) प्राथमिक लाभार्थी यादी जाहीर करण्याचा प्रयत्न सुरू आहे. सहकार विभागाने यासाठी आवश्यक तयारी केली असून, अजित पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधत ही यादी प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न केला जात आहे. यावेळी फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त आयोजित चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन केल्याची माहिती दिली. या प्रदर्शनात त्यांच्या बालपणापासून राजकीय आणि सामाजिक प्रवासातील विविध क्षण छायाचित्रांच्या माध्यमातून मांडण्यात आले आहेत. अजित पवार यांचे व्यक्तिमत्त्व, त्यांचा उमदा स्वभाव, हास्य आणि नेतृत्वगुण या प्रदर्शनातून अनुभवता येतात. दादांवर प्रेम करणाऱ्या प्रत्येकाने हे प्रदर्शन पाहावे, असे आवाहन त्यांनी केले.

दिल्लीतील आंदोलनांच्या पार्श्वभूमीवर बोलताना मुख्यमंत्री म्हणाले की, लोकशाहीत प्रत्येकाला आंदोलन करण्याचा अधिकार आहे. मात्र, संविधानाने दिलेल्या अधिकारांसोबत जबाबदाऱ्यांचाही विचार केला पाहिजे. परवानगी घेऊन शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्यांना प्रशासन सहकार्य करेल. मात्र, विनापरवानगी आंदोलन, हिंसा आणि जाणीवपूर्वक राजकीय अशांतता निर्माण करण्याचा प्रयत्न कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही.

फडणवीस म्हणाले की, नेतृत्वविरहित किंवा 'फेसलेस' आंदोलनांमध्ये काही स्वार्थी प्रवृत्ती घुसून आंदोलनाचा वापर स्वतःचा अजेंडा राबवण्यासाठी करतात. दिल्लीतील आंदोलनातही काही राजकीय पक्ष आणि विविध संघटना स्वतःची राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला.

कालच्या घटनेचा उल्लेख करत मुख्यमंत्री म्हणाले की, कोणत्याही सरकारला आपल्या नागरिकांवर लाठीचार्ज करणे आवडत नाही. मात्र, परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची शक्यता असल्याने पोलिसांनी आवश्यक तेवढीच कारवाई केली. पोलिसांनी मोठा संयम दाखवला असून, अधिक गंभीर घटना टाळण्यासाठी ही कारवाई आवश्यक होती, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले की, सर्व आंदोलकांवर आरोप करणे योग्य नाही. अनेकजण चांगल्या हेतूने आंदोलनात सहभागी झाले असतील. मात्र, काही लोक केवळ अराजकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आंदोलनात सहभागी झाले आहेत. काहींना नीटच्या प्रश्नाशीही संबंध नसून ते स्वतःचा राजकीय अजेंडा पुढे रेटण्याचा प्रयत्न करत असल्याचा दावा त्यांनी केला.



### संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे

# खुडूसमध्ये दुसरे गोल रिंगण

**पंढरपूर (दै. संध्या)**

■ 'ज्ञानोबा माऊली'च्या जयघोषात भक्तिरसाचा सोहळा; अश्वांच्या दौडीने रिंगण उजळले



पंढरपूरकडे मार्गस्थ झालेल्या संत ज्ञानेश्वर माऊलींच्या पालखीचे सोलापूर जिल्ह्यातील दुसरे गोल रिंगण आज खुडूस परिसरात भक्तीमय वातावरणात पार पडले. सकाळी 'ज्ञानोबा माऊली'च्या जयघोषात रिंगण सोहळा संपन्न झाला.

माऊलींची पालखी रिंगण तळावर दाखल झाल्यानंतर सेवेकऱ्यांच्या खांद्यावरून सन्मानपूर्वक रिंगण स्थळी आणण्यात आली. त्यानंतर अश्वांना माऊलींच्या पादुकांवरील हार घालून बुक्का लावण्यात आला. स्वाराचा अश्व व माऊलींचा अश्व रिंगणात चौखूर उधळत दौडले. त्या क्षणी जणू भक्तीचा झंकार आणि परब्रह्माची चाहुल रिंगणात उतरली होती, असा अनुभव वारकऱ्यांनी घेतला. यानंतर मानाच्या दिंड्या रिंगणामध्ये दाखल झाल्या. उड्या, टाळ-मृदंगाच्या गजरात आणि 'ज्ञानोबा-तुकाराम'च्या गजरात पावलांचा खेळ रंगला. टाळ-मृदंगाची जुगलबंदी आणि एकाच लयीत पडणाऱ्या पावलांचा ठेका पाहण्यासाठी वारकऱ्यांनी मोठी गर्दी केली होती. महिलांनी वीणेकरी म्हणून तुळशी वृंदावन घेऊन रिंगण सोहळ्यात सहभाग घेतला. पखवाज वादक व टाळकऱ्यांनी टाळांच्या गजरात भक्तीचा उत्सव अधिक खुलवला. 'माऊली-माऊली'च्या जयघोषात संपूर्ण परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला होता.

## ढिंग-टांग




# आषाढी एकादशीपर्यंत पावसाचा जोर कायम राहणार

**मुंबई (दै. संध्या)**



राज्यातील काही भागात पुन्हा एकदा पावसाला सुरुवात झाली आहे. कुठं कमी तर कुठं जास्त प्रमाणात पाऊस पडत आहे. तर काही भागात अद्यापही पावसानं हजेरी लावली नसल्यानं शेतकरी चिंतेत आहेत. अशातच पुढील पाच दिवस राज्यातील हवामान कसं राहिलं? पावसाची स्थिती काय राहिल? याबाबतची माहिती ज्येष्ठ हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली आहे. गेल्या आठवड्यापासून महाराष्ट्रात दुसऱ्या आवर्तनातील सुरु असलेला मध्यम ते मुसळधार पाऊस अजून पुढील पाच दिवस म्हणजे मोठ्या एकादशी (शनिवार दि. 25 जुलै, पंढरपूर यात्रे) पर्यन्त कायम राहण्याची शक्यता जाणवते. त्यातही विशेषतः आजच्यासारखाच उद्या व परवा (22-23 जुलै) ला पावसाचा जोर अधिक असण्याची शक्यता जाणवत असल्याची माहिती ज्येष्ठ हवामान तज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

रविवार दिनांक 26 जुलै(द्वादशी) ते शुक्रवार दि. 31 जुलै (महिनाअखेर) पर्यंतच्या सहा दिवसात मध्य महाराष्ट्रातील खान्देश, नाशिक ते सांगली सोलापूरपर्यंतच्या 10 व मराठवाड्यातील 8 अश्या 18 जिल्ह्यात काहीशी उघडीप मिळण्याची शक्यता जाणवते. मुंबईसह कोकण व विदर्भात मध्यम ते हलक्या पावसाची शक्यता ही कायम आहे.







# संपादकीय

## वाढवण प्रकल्प : आर्थिक महत्त्वाकांक्षेचे केंद्र

भारत जागतिक उत्पादन आणि पुरवठा साखळीत आपले स्थान मजबूत करण्याचा प्रयत्न करत असताना, वाढवण बंदर हे ब्ल्यू इकॉनॉमी, सागरमाला आणि विकसित भारत २०४७ या राष्ट्रीय विकास दृष्टिकोनाला बळ देणारे महत्त्वाचे केंद्र ठरेल. हे बंदर केवळ मालवाहतुकीचे केंद्र न राहता भारताच्या आर्थिक सामर्थ्याचे, जागतिक व्यापारातील वाढत्या प्रभावाचे आणि औद्योगिक क्षमतेचे प्रतीक बनेल. २०४७ मध्ये भारत विकसित राष्ट्र म्हणून जगासमोर उभा राहील, तेव्हा त्या यशोगाथेत वाढवण बंदराचे योगदान अत्यंत महत्त्वाचे मानले जाईल. हे बंदर भारताच्या आर्थिक महत्त्वाकांक्षा, औद्योगिक प्रगती आणि जागतिक नेतृत्वाच्या स्वप्नांना दिशा देणारे केंद्र ठरेल. वाढवण बंदर प्रकल्पाचे काम अतिशय सुनियोजित आराखड्याप्रमाणे सुरू असून, प्रशासनाने, तसेच 'वाढवण बंदर पोर्ट प्रकल्प कंपनी'ने स्थानिक लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी आणि त्यांना नोकरीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी सकारात्मक पावले उचलली आहेत. स्थानिक युवा वर्ग या नवीन संधींसाठी तयार व्हावा, म्हणून 'आयटीआय'मध्ये विशेष व विविध कोर्सेस सुरू करण्यात आले आहेत. बंदर कार्यान्वित झाल्यानंतर थेट रोजगार मिळावेत या उद्देशाने तसे कोर्स बनवण्यात आले असून स्थानिक व होतकरू तरुणांना रोजगाराभिमुख शिक्षण देण्यात येत आहे. यासाठी मुंबई विद्यापीठाशी रीतसर करार करण्यात आला असून, विद्यापीठाने पालघरमधील १२ महाविद्यालयांमध्ये बंदराशी संबंधित विशेष कोर्सेस सुरू करण्याचे नियोजन केले आहे.

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी दोन वर्षांत दिल्ली-मुंबई एक्सप्रेसवे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून, वाढवण लिंक हा त्याचाच एक मुख्य भाग आहे. नवीन रस्ते, मुंबई-दिल्ली एक्सप्रेस हायवे, विमानतळ, औद्योगिक वसाहत आणि शिपिंग संबंधित प्रोजेक्ट्समुळे पालघर हे भविष्यातील चौथी मुंबई म्हणून उदयास येणार असून, येथील तरुणांचे भविष्य अधिक उज्ज्वल आणि आत्मनिर्भर होणार, यात जराही शंका नाही. देशासाठी अत्यंत महत्त्वाचा असणारा हा प्रकल्प स्थानिकांचे जीवनमान पूर्णपणे पालटवून टाकणारा आहे. बंदर हाताळणी क्षमतेच्या दृष्टिकोनातून या प्रकल्पाला खीळ बसणे किंवा उशीर होणे हे कोणाच्याही हिताचे नाही. दुर्दैवाने असे झाल्यास या बंदराच्या निमित्ताने निर्माण होणारे दहा लाखांहून अधिक रोजगारांपासून येथील स्थानिक तरुण वर्ग वंचित राहील. वाढवण बंदराची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्याची नैसर्गिक २० मीटर खोली. यामुळे २४ हजार टीईयू क्षमतेची अतिविशाल कंटेनर जहाजे येथे सहजपणे येऊ शकतील. परिणामी भारताला दुबई, सिंगापूर आणि कोलंबो यांसारख्या परदेशी ट्रान्सशिपमेंट केंद्रांवरील अवलंबित्व कमी करता येईल, तसेच निर्यातदारांचा वेळ आणि खर्च वाचेल. पूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर या बंदराची वार्षिक मालवाहतूक क्षमता २९८ दशलक्ष मेट्रिक टन आणि कंटेनर हाताळणी क्षमता २४.५ दशलक्ष टीईयू इतकी असेल. ही क्षमता भारतातील अनेक विद्यमान प्रमुख बंदरांच्या एकत्रित क्षमतेशी स्पर्धा करणारी आहे. त्यामुळे भारताच्या निर्यात साखळीमध्ये मोठा बदल घडून येण्याची अपेक्षा आहे. वाढवण बंदर भारत-मध्यपूर्व-युरोप आर्थिक कॉरिडॉर आणि आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण वाहतूक कॉरिडॉर यांच्याशी जोडले जाणार असल्यामुळे जागतिक व्यापार साखळीतील भारताचे स्थान अधिक मजबूत होईल. महाराष्ट्राची सध्याची निर्यात सुमारे ७० अब्ज डॉलर्स इतकी असून, या बंदरामुळे राज्य आणि देशाच्या निर्यात क्षमतेत लक्षणीय वाढ होण्याची शक्यता आहे. वाढवण बंदराला दिल्ली-मुंबई एक्सप्रेस-वे, डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर, राष्ट्रीय महामार्ग आणि आधुनिक रेल्वे नेटवर्कशी जोडण्यात येणार आहे. त्यामुळे महाराष्ट्र, गुजरात, मध्य प्रदेश, छत्तीसगड आणि कर्नाटकमधील उद्योगांना जागतिक बाजारपेठेशी थेट संपर्क साधता येईल. वाढवण बंदर हा केवळ पायाभूत सुविधा प्रकल्प नसून रोजगारनिर्मिती आणि औद्योगिक विकासाला चालना देणारा मोठा आर्थिक उपक्रम आहे.

## प्रलंबित निवडणुका

महाराष्ट्रातील २० जिल्हा परिषदा व २११ पंचायत समित्यांच्या प्रलंबित निवडणुका घेण्याबाबत सर्वोच्च न्यायालयाने राज्य निवडणूक आयोगाला आपली स्पष्ट भूमिका मांडण्यासाठी शुक्रवारपर्यंतचा अवधी दिला असून प्रकरणाची पुढील सुनावणीही शुक्रवारी ठेवण्यात आली आहे. सरन्यायाधीश न्या. सूर्यकांत, न्या. जॉयमल्या बागची आणि न्या. विपुल एम. पांचोली यांच्या त्रिसदस्यीय खंडपीठासमोर आज या संदर्भातील ५० हून अधिक याचिका व अर्जांवर सुनावणी झाली. सुनावणीदरम्यान ज्येष्ठ विधीज्ञ गोपाल शंकर नारायणन यांनी ओबीसींच्या राजकीय आरक्षणासाठी समाजाच्या मागासलेपणाचा शास्त्रीय अभ्यास पूर्ण होणे आवश्यक असल्याचे सांगितले. त्यावर याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. देवदत्त पालोदकर यांनी, असा अभ्यास पूर्ण होईपर्यंत निवडणुका प्रलंबित ठेवणे योग्य ठरणार नसल्याचे सांगत राज्य निवडणूक आयोगाने तातडीने निवडणूक प्रक्रिया सुरू करावी, अशी विनंती केली.

## गुरु वचन

### यश गाठायचे असेल तर स्वयंशिस्त हवीच

ज्याप्रमाणे आग आपल्या उष्णतेच्या साहाय्याने सोन्याला उजळून टाकते, अगदी त्याचप्रमाणे स्वयंशिस्त कोणत्याही तरूणाचे व्यक्तिमत्त्व चमकविण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. स्वयंशिस्त बाळगणाऱ्या तरूणाची पावलं नेहमी यशाकडे वेगाने सरकत असतात; पण ही स्वयंशिस्त म्हणजे नेमके काय तर ही स्वयंशिस्त म्हणजे आपली पावलं योग्य दिशेकडे वळविणे. स्वयंशिस्तीमुळे तुम्ही कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहू शकता. डगमगून न जाता धैर्याने, संकटाचा सामना करू शकता. मात्र स्वयंशिस्त अंगी बाणण्यासाठी गरज असते ती आळस आणि सुखाचा त्याग करण्याची! स्वयंशिस्त लावून घेतल्याने कोणी लहान होत नाही. एकदा का आपण स्वत:ला शिस्त लावून घेतलीत की, तुमच्या व्यक्तिमत्त्वात आणि जीवनात बदल झालाच म्हणून समजा. यामुळे तुम्हाला नैतिक छळ आणि निरोगी आरोग्य लाभते, ते वेगळेच.

## उपदेशकथा

### द्वेषाचे मूळ

एका शहरात राजमार्गावर चंदनाच्या लाकडाचे एक दुकान होते. त्या दुकानाचा मालक गल्ल्यावर बसलेला असे. दुकानाची तपासणी करून गोळा करणारा सरकारी अधिकारी दुकानात येऊन कराचे पैसे घेऊन जायचा. पण का कोणास ठाऊक; त्या मालकाला पाहिले की, त्या अधिकाऱ्याच्या मनात अतिशय नावड उत्पन्न होत असे. त्याला शिक्षा करावी असे उगीचच मनात येईल. अधिकाऱ्याला याचे फार आश्चर्य वाटे. हा काय प्रकार आहे ते समजून घ्यावे. म्हणून अधिकाऱ्याने मालकाला ऑफिसमध्ये बोलावले. अधिकाऱ्याने आपल्या मनात जे येते ते सांगितले. तेव्हा मालक म्हणाला, 'साहेब, माझा धंदा विशेष चालत नाही. तुम्हाला पाहिले की मनात येते तुम्ही मेला तर माझी पुष्कळ विक्री होईल. म्हणून माझे मन सारखे तुमच्या मृत्यूची इच्छा करते.'

कथा उपदेश : आपल्या मनातील प्रेमाचे वा द्वेषाचे विचार दुसऱ्याच्या मनावर जाऊन आदळतात. जगाला कळणार नाही. पण द्वेषाचे मूळ आपल्या मनातच असते.



## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | तिथि:नवमी (अहोरात्र) |
| २२जुलै २०२६ | नक्षत्र:स्वाती २३:०३:०१ |
| बुधवार | योग:साध्य १८:४१:२३ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:बालव १८:०६:४४ |
| आषाढ शके | करण:कौलव (अहोरात्र) |
| संवत्– १९४८ | सूर्य:कर्क |
| संवत्सर – पराभवनाम | चन्द्र:तुला |
| अयन– दक्षिणयन | हिजरी सन् – १४४८ |
| मास– आषाढ | मुस्लिम मास – सफर |
| ऋतु– सौर वर्षा | तारीख – ७ |
| शुक्ल पक्ष | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकू क्र. १०१८

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 6 | | | 4 | 7 | | | | 5 |
| | 8 | 9 | 5 | | | | 4 | |
| 4 | | 2 | 9 | | | 3 | | 7 |
| | 3 | 7 | | | | 2 | | 9 |
| | 9 | | | | | | 3 | |
| 2 | | 6 | | | | 8 | 7 | |
| 9 | | 5 | | | 8 | 7 | | 3 |
| | 2 | | | | 6 | 5 | 1 | |
| 1 | | | | 3 | 5 | | | 4 |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १०१७ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 4 | 2 | 7 | 6 | 5 | 3 | 9 | 1 |
| 5 | 3 | 1 | 4 | 9 | 2 | 7 | 8 | 6 |
| 7 | 6 | 9 | 1 | 8 | 3 | 2 | 5 | 4 |
| 1 | 5 | 3 | 8 | 7 | 4 | 9 | 6 | 2 |
| 9 | 7 | 4 | 5 | 2 | 6 | 1 | 3 | 8 |
| 2 | 8 | 6 | 3 | 1 | 9 | 4 | 7 | 5 |
| 6 | 2 | 7 | 9 | 4 | 8 | 5 | 1 | 3 |
| 4 | 9 | 5 | 6 | 3 | 1 | 8 | 2 | 7 |
| 3 | 1 | 8 | 2 | 5 | 7 | 6 | 4 | 9 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९९९ – मैक्रोसॉफ्टने एमएसएन मॅसेंजरचा पहिला वरझन जारी केले.
- २००६ – इस्त्राइली सैनिक आणि लेबनॉनी बंडखोरांमध्ये झालेल्या चकमकीत हिजबुल्लाचे १३ जण ठार झाले.

### राष्ट्रीय

- १९०८ – लोकमान्य टिळकांना सहा वर्षांची काळ्या पाण्याची शिक्षा सुनावण्यात आली.
- १९३० – महात्माजींच्या नेतृत्वाखाली जंगल सत्याग्रहास सुरुवात झाली.
- २००६ – युद्धाचा सामना करत असलेल्या लेबनॉनहून ६०१ भारतीय सुखरुप मायदेशात परतले.
- २००६ – पश्चिम बंगालच्या माल्डा जिल्ह्यातील बामुनगोला भागात लग्नाच्या वऱ्हाडच्या ट्रकला चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे झालेल्या अपघातात १२ जण ठार तर ४८ जण जखमी झाले.

### जन्म

- १७४२ – विश्वासराव नानासाहेब पेशवे यांचे पराक्रमी पुत्र.
- १९२३ – मुकेश, प्रसिद्ध भारतीय गायक.
- १९४९ – मोहम्मद बीन रशिद अल मकतुम, संयुक्त अरब अमिरातचे पंतप्रधान.
- २००२ – फिलीक्स, डेन्मार्कचा राजकुमार.

### निधन

- १५४० – जॉन झपोलिया, हंगरीचा राजा.
- १९१८ – इंद्रलाल रॉय, भारतीय वैमानिक.
- १९५० – राजा विलियम ल्युन मॅकेंझी,कॅनाडाचे दहावे पंतप्रधान.
- २००३ – खुसे हुसैन, सद्दाम हुसैनचा पुत्र.
- २००३ – उदेय हुसैन, सद्दाम हुसैनचा पुत्र.

## : SMS :

Doctor: Tumhe tension kis baat ki hai?
Patient: Doctor sahab, log kehte hain main bahut bolta hu.
Doctor: Kaun kehta hai?
Patient: Meri biwi... bas rukiye, uska call aa raha hai, 2 min me batata hu.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | २७.२ | २३.७ |
| अहमदनगर | २९.८ | २३.४ |
| अकोला | ३६.३ | २६.९ |
| अमरावती | ३५.६ | २६.५ |
| बीड | ३९.६ | २७.१ |
| भंडारा | ३४.६ | २६.४ |
| बुलढाणा | ३६.१ | २७.४ |
| चंद्रपूर | ३९.६ | २६.७ |
| चेन्नई | ४०.१ | ३०.८ |
| नवी दिल्ली | ४१.३ | ३३.७ |
| धुळे | ३५.९ | २६.८ |
| गोंदिया | ३३.५ | २५.६ |
| जळगाव | ३६.३ | २६.६ |
| कोल्हापूर | २५.५ | २३.१ |
| लातूर | ३१.९ | २४.१ |
| मुंबई | ३१.६ | २७.४ |
| नागपूर | ३५.५ | २६.७ |
| नांदेड | ३२.६ | २६.१ |
| नंदूरबार | ३१.५ | २५.४ |
| नाशिक | २६.६ | २३.९ |
| पुणे | २६.५ | २२.८ |
| पंढरपूर | ३२.३ | २३.९ |
| सातारा | २६.८ | २२.५ |
| सांगली | २६.३ | २३.५ |
| सोलापूर | ३३ | २४.४ |
| वर्धा | ३८.३ | २६.९ |



## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पश्चिम
गती मध्यम राहील. अडचणींचा सामना करावा लागेल.

**तूळ :** शुभ रंग: पांढरा, अनुकूल दिशा : पूर्व
विचार करुन कामे केल्यास परिस्थिती सुदृढ बनवू शकेल.

**वृषभ :** शुभ रंग: हिरवा, अनुकूल दिशा : दक्षिण
कौटूंबिक सुख आणि आर्थिक अनुकूलतेमुळे मन प्रसन्न राहिल. उद्योगधंदा चांगला चालेल.

**वृश्चिक :** शुभ रंग: हिरवा, अनुकूल दिशा : पश्चिम
सहकार्याने दिवस उत्साहपूर्ण जाईल. थकित पैसे मिळवण्याचे प्रयत्न यशस्वी होतील.

**मिथून :** शुभ रंग: गुलाबी, अनुकूल दिशा : पश्चिम
सामाजिक कार्यांमुळे सुयश आणि सन्मान मिळू शकेल. कामे पूर्ण होतील.

**धनू :** शुभ रंग : काळा, अनुकूल दिशा : दक्षिण
योजनेनुसार कामे केल्यास फायदा होईल. कौटूंबिक जबाबदाऱ्या पार पाडू शकाल.

**कर्क :** शुभ रंग: गुलाबी, अनुकूल दिशा : दक्षिण
बुद्धि आणि मनोबलाने सुख–संपन्नतेची परिस्थिती बनेल.आळस सोडून द्या.

**मकर :** शुभ रंग: लाल, अनुकूल दिशा : पश्चिम
दूरदर्शिपणाने आणि बुद्धिचातूर्याने समस्या दूर होतील.

**सिंह :** शुभ रंग : पिवळा, अनुकूल दिशा : पूर्व
नवीन कामकाजांचे योग प्रबळ आहेत.कौटूंबिक समस्या राहू शकतात.

**कुंभ :** शुभ रंग : गुलाबी, अनुकूल दिशा : पूर्व
वातावरण अनुकूल असूनही कामे होऊ शकणार नाही. खर्च विचार करुन करा.

**कन्या :** शुभ रंग: काळा, अनुकूल दिशा : पूर्व
मानसिक तनावापासून सुटका मिळेल.उद्योगधंदा ठीक चालेल.

**मीन :** शुभ रंग : निळा, अनुकूल दिशा : पश्चिम
प्रयत्न सार्थक होतील. परिवर्तन किंवा नवीन संधी फायदेशीर राहतील. प्रवास कष्टदायी होऊ शकतात.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०१८



### आडवे शब्द

१. नमुना, मासला
३. वार्ताहर
७. चमकणारी बंगाली मिठाई?
१०. मिठी
१०अ. आस्था, प्रेम, माया
१२. मिठाला न जगणारा
१४. अंदाज करणे
१७. घाण
१८. 'आ'काराचे चिन्ह
१९. मांडणी, सजावट
२१. पायापासून डोक्यापर्यंत
२३. ज्वारी–बाजरीचा पदार्थ
२५. वर्तमानपत्रातीक कप्पा
२७. शूर
२९. काचेला पडलेली चीर
३०. उलटसुलट आगबोटच!
३२. सैन्याचा मालपुरवठा
३४. प्रामाणिख, सोज्वळ
३६. शत्रूच्या नाशाचे मंत्रतंत्र
३८. चामखीळ
४०. भरभराट
४१. डोंगरा किल्ला
४२. वाळा
४३. घटस्फोट
४४. मगज
४५. प्रार्थना
४६. मंत्रीमंडळ
४८. गंध उगाळण्याचे जोडसाधन
५०. आजूबाजूला
५०अ. तोरा, माज
५१. जाणीव
५२. अब्रूदार
५५. महात्मा गांधीजींचे नाव
५७. दृष्टीभेट
६१. सदोदित
६३. जुनीच्या विरुद्ध
६५. राखण करणारा
६७. चटकन, त्वरित
६८. सज्जनगडचे संत
७१. गंध
७२. अर्धांगवायू
७३. गव्हाचे पीठ
७४. मालाची विक्री
७६. सडक
७७. बाळभाषते देव
७८. कणीदार
७९. फळांचे पेय

### उभे शब्द

१. डोंगा
२. अननुभवी
३. थापा
४. माशाची रास
५. किंमत
६. दागदागिने
७. ओरखडा
८. माझे
९. चार आठवडे
१०. पुष्परस
११. सापाची एक जात
१३. ही पिऊन लगेच गोरेपणा थोडाच मिळणार!
१५. कोंबड्याचे आवरणे
१६. कारणाशिवाय
१८. उसाच्या रसाचा घट्ट रांधा
२०. नाला, खंदक
२२. हेतू, कारण
२३. चारी ठाव जेवणातील दोन प्रमुख पदार्थ
२४. पादत्राण
२६. नासाडी, विध्वंस
२८. चांदी
३०. जून, निबर
३१. हिशोब
३३. क्षुल्लक किंमतीचे नाणे
३५. पदरी सैनिक बाळगणारा
३६. झोपेचे खोबरे!
३७. हिचे चोचले पुरवणे म्हणजे अनारोग्याला आमंत्रण
३९. एकमेकांसमोर
४३. सावरीचा असल्यास सगळ्यात मऊ
४४. तारणपत्र
४५. कमिशन, दलाली
४६. श्रीमंत
४६अ. लोखंड घसण्याचे हत्यार
४७. राख
४८. शिक्षा
४९. झोपडी
५३. दानशूर
५४. मातीचा कण
५६. पोते शिवण्याची सुई
५८. रात्री सुगंध पसरवणारी वनस्पती
५९. खाण्याची तंबाखू
६०. पातळसर
६१. पंजाबमधील एक नदी
६२. समशेर
६३. अपुऱ्या नाकाची
६५. अफूचे बीज
६६. खटला, हक्क (सांगणे)
६९. दहावी रास
७०. पुरावा असल्यास पुरेसा भक्कम
७३. खण पण कापड नव्हे
७५. पंख, दुसऱ्याचा

उत्तर उद्याच्या अंकात

### जम्बो शब्दकोडे क्र. १०१७ चे उत्तर

आडवे उत्तर : १.कावराबावरा ५.असाधारण ८.पर्ण ९.खट १०.जगन्नाथ १२.डम १३.वर १४.भाषण १५.कोसरा १६.कयास १८.वहिवाट २०.दाखला २२.डास २४.मानिनी २५.रटरट २४.दम ३०.नीट ३२. वर्तमानपत्र ३३.चरवी ३४. मनगट ३६.कारभार ३८.कर्ज ४०.पडाव ४१.रस ४२.खादी ४३.भोजनावळ ४५.डाका ४७.नाट ५०.नकलाकार ५२.जमा ५४.वारकरी ५६.पनीर ५८.जवळजवळ ६०.मस्त ६१.सनई ६३.घर ६४.सामना ६६.पुरता ६७.मरवा ६८.सागर ७०.रम्य ७१.राक्षस ७२.गवगवा ७३.दाम ७४.खास ७५.सोम ७६.लगत ७८.धरणीकंप ८०.साय ८१.अंतर ८२.खानदान ८३.सरडा

उभे उत्तर : १.कारभारीण २.राखणदार ३.बाट ४.राजस ५.अथक ६.धाडस ७.रम ८.परवा ११.गारडा १३.वहिनी १५.कोलार १७.यात्रा १८.वनिता १९.टवटवीत २१.खटपट २३.सदमा २६.टवका २८.मनकवडा २९.पत्रकार ३०.नीर ३१.जनकजननी ३३.चरखा ३५.गर्जना ३७.रसना ३९. मळकट ४०.परका ४४.वन ४६.काजळ ४८.टवाळ ४९.कोरी ५१.रजई ५३.माजघर ५५.कलम ५६.पळपुटा ५७.रमताराम ५९.वर ६१.सर ६२.नवागत ६४.साम्य ६५.नापास ६७.मसलत ६८.सागवान ६९.गवा ७०.रमणी ७३.दार ७४.खापर ७५.सोय ७७.गर ७८.धन ७९.कंस

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे




### सोलापूर माळीनगर मध्ये संत तुकोबाचे उभे रिंगण संपन्न

**माळीनगर : दैनिक संध्या**

सोलापूर जिल्ह्यातील माळीनगर येथे मंगळवार दिनांक 21 जुलै रोजी जगद्गुरु तुकाराम महाराजांची पालखी सकाळी नऊ वाजता उभे रिंगण सोहळा पार पडला या रिंगणामध्ये अश्व दावले माऊली भक्तांनी कुंडलिकावरदेव हरी विठ्ठल श्री ज्ञानदेव तुकाराम एकच जय घोषणा केली भक्तिमय वातावरण दुमदुमून गेले ह्या वेळी मॉडेल हायस्कूल माळीनगर यांच्या वतीने सांस्कृतिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी साक्षरता दिंडी काढून संत तुकोबाच्या पालखीचे स्वागत केले अशी माहिती बाळासाहेब सोनवणे यांनी दैनिक संध्या ला दिली.

### दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी पुरस्कार; ऑनलाइन अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे : दैनिक संध्या**

भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयांतर्गत दिव्यांगजन सक्षमीकरण विभागामार्फत दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय पुरस्कार-२०२६ प्रदान करण्यात येणार असून, त्यासाठी पात्र दिव्यांग व्यक्ती, संस्था, संघटना तसेच संबंधित घटकांकडून ऑनलाइन अर्ज व नामांकन मागविण्यात आले आहेत. इच्छुकांनी ३१ जुलै २०२६ पर्यंत राष्ट्रीय पुरस्कार पोर्टलवर अर्ज सादर करावेत, असे आवाहन सहाय्यक आयुक्त, दिव्यांग सक्षमीकरण डॉ. राधाकिसन देवढे यांनी केले आहे. राष्ट्रीय पुरस्कारांसाठी अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया १५ मे पासून सुरू झाली असून, विहित मुदतीत प्राप्त होणाऱ्या अर्ज व नामांकनांचा विचार करून वर्ष २०२६ चे राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात येणार आहेत. अर्ज राष्ट्रीय पुरस्कार पोर्टल https://awards.gov.in वर केवळ ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जाणार असून, प्रत्यक्ष अथवा इतर कोणत्याही माध्यमातून सादर करण्यात आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत. अर्जदारांनी पोर्टलवर उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यानुसार सर्व माहिती अचूकपणे भरावी. तसेच, दिव्यांग व्यक्तींच्या सक्षमीकरण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय, प्रेरणादायी व नाविन्यपूर्ण कार्याचा वर्णनात्मक तपशील नमूद करून त्यासंबंधीची आवश्यक सहाय्यक कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करावीत. राष्ट्रीय पुरस्कारांसाठी सर्वश्रेष्ठ दिव्यांगजन, श्रेष्ठ दिव्यांगजन आणि श्रेष्ठ सृजनशील दिव्यांग बालक/बालिका या उप-श्रेणींमध्ये अर्ज मागविण्यात आले आहेत. श्रेष्ठ सृजनशील दिव्यांग बालक/बालिका या उप-श्रेणीसाठी अर्ज करताना यूडीआयडी कार्ड अथवा दिव्यांगत्व प्रमाणपत्र अपलोड करणे अनिवार्य आहे. राष्ट्रीय पुरस्कारांसाठीची पात्रता, निकष, अर्ज प्रक्रिया व मार्गदर्शक तत्त्वांची सविस्तर माहिती https://depwd.gov.in आणि https://awards.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध असून, इच्छुकांनी त्याचा संदर्भ घेऊन विहित मुदतीत अर्ज सादर करावेत, असेही डॉ. देवढे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

### महारक्त दान शिबिरात रक्तदात्यांसाठी यादगार सोशल फाउंडेशनतर्फे स्नेहभोजन

**पुणे : दैनिक संध्या**



दिवंगत उपमुख्यमंत्री तथा विकासपुरुष स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य महारक्तदान शिबिरात रक्तदात्यांच्या सेवेसाठी यादगार सोशल फाउंडेशनच्या वतीने स्नेहभोजनाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाला रक्तदाते, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सुमारे १५०० हून अधिक नागरिकांनी सहभाग नोंदवत समाजसेवेचा आदर्श निर्माण केला. रक्तदानासारख्या पवित्र कार्यासाठी आलेल्या रक्तदात्यांना भोजनाची उत्तम व्यवस्था करून त्यांचा सन्मान करण्यात आला. यादगार सोशल फाउंडेशनच्या या उपक्रमाचे उपस्थितांकडून कौतुक करण्यात आले. रक्तदात्यांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत संपूर्ण नियोजन शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आले होते. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी यादगार सोशल फाउंडेशनच्या सर्व सभासदांसह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. विशेषतः अन्सारभाई आतार, गणेशभाईजी सोनवणे, छगन आटोळे, सुभाष मोहिते, प्रशांत महाडिक, ओंकार राऊत, ऋषिकेश हराळे, दादा मोडक, इरफान बागवान, अब्रार बागवान, जीशान बागवान, फारूक सय्यद आणि झहीर बागवान यांनी मोलाचे सहकार्य केले. तसेच अवेसभाई (भटारी) आणि त्यांच्या संपूर्ण टीमने स्वादिष्ट व दर्जेदार भोजनाची उत्कृष्ट व्यवस्था केल्याबद्दल त्यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले. युवा नेते जयदादा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या महारक्तदान शिबिरात रक्तदात्यांची सेवा करण्याची संधी मिळाल्याबद्दल फिरोज अजिजभाई बागवान (प्रदेश उपाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अल्पसंख्याक विभाग), सौ. आफ्रीन फिरोज बागवान (नगरसेविका, बारामती नगर परिषद) आणि अमजद अजिजभाई बागवान (माजी नगरसेवक) यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे शहराध्यक्ष किरणभाऊ इंगळे तसेच पक्षाच्या सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार मानले. या उपक्रमामुळे रक्तदानासारख्या सामाजिक चळवळीला अधिक बळ मिळाले असून, समाजहितासाठी सर्वांनी एकत्र येऊन केलेले कार्य हे इतरांसाठीही प्रेरणादायी ठरल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### सायबर चोरट्यांना बँक खाते वापरण्यास देऊन एक कोटी ३२ लाखांची फसवणूक

**पुणे : दैनिक संध्या**

सायबर गुन्हेगारांच्या आंतरराज्य टोळीला स्वतःचे बँक खाते वापरण्यास देऊन एक कोटी ३२ लाख ७९ हजार रुपयांच्या बेकायदेशीर व्यवहारांना मदत केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी हडपसर पोलिसांनी संबंधित बँक खातेदाराविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. पोलिस हवालदार माधुरी डोके यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, बँकेच्या एका खातेदाराने त्याचे खाते सायबर गुन्हेगारांना पुरवले होते. या खात्याचा वापर करून सायबर गुन्हेगारांनी चौघांची एक कोटी ३२ लाखांपेक्षा जास्त रकमेची फसवणूक केली. ऑनलाइन गुंतवणुकीवर भरघोस नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून सायबर चोरट्यांनी शहरातील दोघांना २४ लाख ५८ हजार रुपयांचा गंडा घातल्याचे उघडकीस आले आहे.

# १५ दिवसीय विशेष स्वच्छता अभियान

**महापौर मा. मंजुषा ताई नागपुरे यांचा पुढाकार**

■ पुणे (दै. संध्या)



स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त पुणे महानगरपालिकेच्या वतीने शहरभर १५ दिवसीय विशेष स्वच्छता अभियान राबविण्यात येणार असून, या अभियानाचे प्रभावी नियोजन करण्यासाठी आज महापौर मा. मंजुषा ताई नागपुरे यांच्या अध्यक्षतेखाली महापौर कार्यालयात सर्वपक्षीय बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीस उपमहापौर मा. परशुराम वाडेकर, स्थायी समिती अध्यक्ष मा. श्रीनाथ भिमाले, गटनेते मा. गणेश बिडकर, विरोधी पक्षनेते मा. निलेश निकम, माजी महापौर, नगरसेवक, महापालिका आयुक्त मा. नवल किशोर राम, अतिरिक्त आयुक्त मा. प्रजीत नायर, उपआयुक्त तसेच सर्व क्षेत्रीय अधिकारी उपस्थित होते.

बैठकीत महापौर मा. मंजुषा ताई नागपुरे यांनी सांगितले की, "स्व. अजितदादा पवार यांनी सार्वजनिक स्वच्छतेला नेहमीच सर्वोच्च प्राधान्य दिले. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे पुणे शहर अधिक स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक बनविणे होय. ही मोहीम केवळ प्रशासनाची नसून प्रत्येक पुणेकराची आहे. नागरिकांचा सक्रिय सहभाग मिळाल्यास स्वच्छतेचे हे लोकआंदोलन अधिक प्रभावी ठरेल." महापौरांनी प्रशासनाला शहरातील सर्व क्षेत्रीय कार्यालयांमार्फत २२ जुलै २०२६ पासून १५ दिवसांचे विशेष स्वच्छता अभियान राबविण्याच्या सूचना दिल्या. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयात स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी आणि कर्मचारी यांच्या सहभागातून दैनंदिन नियोजन करण्यात यावे. सार्वजनिक ठिकाणे, प्रमुख रस्ते, पदपथ, चौक तसेच क्रॉनिक स्पॉटची विशेष स्वच्छता करण्यात यावी, असे निर्देश त्यांनी दिले. याशिवाय स्वयंसेवी संस्था, सामाजिक संस्था, नागरिक, युवक मंडळे आणि स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या सहभागातून ही मोहीम लोकचळवळीच्या स्वरूपात राबविण्यात यावी, तसेच घरातील टाकाऊ व खराब वस्तू संकलनासाठी विशेष मोहीम आयोजित करण्यात यावी, अशाही सूचना देण्यात आल्या. स्वच्छता अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या क्षेत्रीय कार्यालयांना प्रोत्साहन देण्यासाठी विशेष पारितोषिक योजना जाहीर करण्यात आली आहे. या योजनेअंतर्गत प्रथम क्रमांकाच्या क्षेत्रीय कार्यालयास ₹५० लाख, द्वितीय क्रमांकाच्या क्षेत्रीय कार्यालयास ₹२५ लाख, तर तृतीय क्रमांकाच्या क्षेत्रीय कार्यालयास ₹१५ लाखांचे पारितोषिक प्रदान करण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे क्षेत्रीय कार्यालयांमध्ये स्वच्छतेबाबत निरोगी व सकारात्मक स्पर्धा निर्माण होईल, कामकाजाच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा होईल आणि नागरिकांना अधिक स्वच्छ, सुंदर व दर्जेदार नागरी सेवा उपलब्ध होतील. या माध्यमातून "स्वच्छ पुणे, सुंदर पुणे" हे उद्दिष्ट अधिक प्रभावीपणे साध्य होईल, असा विश्वास महापौर मा. मंजुषा ताई नागपुरे यांनी व्यक्त केला.

महापौरांनी अभियानाचा व्यापक प्रचार रेडिओ संदेश, होर्डिंग्ज, फलक व जनजागृती उपक्रमांच्या माध्यमातून करण्यात यावा. त्यामध्ये "पुणे प्रथम" हा लोगो वापरण्यात यावा , तसेच स्वच्छता कामगारांसाठी आवश्यक सुरक्षासाहित्य, हातमोजे, फवारणी यंत्रे व इतर साहित्य वेळेत उपलब्ध करून देण्याचे निर्देश प्रशासनाला दिले.

यावेळी महापौरांनी स्पष्ट केले की, या अभियानासाठी आवश्यक निधीची कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही. प्रत्येक क्षेत्रीय कार्यालयाने लोकसहभागातून ही मोहीम यशस्वी करावी आणि स्वच्छ, सुंदर व निरोगी पुणे घडविण्यासाठी सर्वांनी एकत्रितपणे काम करावे. पुणे महानगरपालिकेच्या वतीने महापौर मा. मंजुषा ताई नागपुरे यांनी सर्व पुणेकरांना या विशेष स्वच्छता अभियानात सक्रिय सहभाग नोंदवून स्वच्छ, सुंदर, हरित आणि निरोगी पुणे घडविण्यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे.

## पुण्यात पावसाची दमदार हजेरी; रस्ते जलमय, नागरिकांची तारांबळ

■ पुणे (दै. संध्या)

गेल्या तीन-चार दिवसांपासून सुरू असलेल्या हलक्या पावसानंतर मंगळवारी (ता. २१) शहरात पावसाने दमदार हजेरी लावली. दुपारनंतर वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक रस्ते जलमय झाले, तर प्रमुख चौक आणि रस्त्यांवर वाहतूक कोंडी झाल्याने नागरिकांची चांगलीच तारांबळ उडाली. वातावरणात गारवा निर्माण झाला असला, तरी पाणी साचणे, वाहतूक विस्कळीत होणे आणि काही भागांत वीजपुरवठा खंडित होण्याच्या घटनांमुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागला. शहर आणि परिसरात मंगळवारी पहाटे पाचच्या सुमारास पावसाने सुरुवात केली. काही काळ विश्रांती घेतल्यानंतर दुपारी दोनच्या सुमारास पावसाचा जोर अचानक वाढला. त्यानंतर सुमारे चार तास शहराच्या विविध भागांत जोरदार सरी कोसळत राहिल्या. कोथरूड, डेक्कन, शिवाजीनगर, सिंहगड रस्ता, बाणेर, औंध, बालेवाडी, स्वारगेट, धनकवडी, कात्रज, हडपसर, कोंढवा, बावधन, पाषाण, बिबवेवाडी, लोहगाव, विश्रांतवाडी, म्हाळुंगे, सूस रस्ता, खडकवासला, उंड्री आणि खराडी परिसरात मुसळधार पाऊस झाला. काही भागांत पावसाचा जोर अधिक होता, तर काही ठिकाणी मध्यम स्वरूपाचा पाऊस पडला. मुसळधार पावसामुळे शहरातील अनेक रस्त्यांवर गुडघाभर पाणी साचले. अनेक ठिकाणी पावसाच्या पाण्यामुळे रस्त्यांवरील खड्डे पूर्णपणे झाकले गेले.

## 'स्वच्छ, सुंदर आणि हरित बारामती' संकल्पनेला पूरक उपक्रम

■ दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त बारामती एमआयडीमध्ये १ हजार वृक्ष लागवडीचे नियोजन-प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील

■ पुणे (दै. संध्या)



दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जंयतीचे औचित्य साधून उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती कॅटलफिडस् प्रा. लि.च्यावतीने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या परिसरात १ हजार वृक्ष लागवडीचे नियोजन आले आहे. वृक्ष लागवड कार्यक्रमाचा प्रारंभ 22 जुलै पासून करण्यात येणार आहे, अशी माहिती बारामती एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी हनुमंत पाटील यांनी दिली आहे. एम.आय.डी.सी. परिसरातील बिरोबा मंदिर परिसरात १५०, एम. आय. डी. सी. फेज २ वॉटर टँक परिसरात १७५, ग्रामपंचायत वंजारवाडी येथे १०० तसेच एम. आय. डी. सी. फेज २ ग्रामपंचायत कटफळ येथे ५७५ झाडांचे वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा 'स्वच्छ, सुंदर आणि हरित बारामती' दूरदृष्टीचा व एक महत्त्वाचा संकल्प होता. पर्यावरण संवर्धन व हरित क्षेत्र वाढीसाठी हा उपक्रम राबविण्यात येत असून स्थानिक प्रशासन व संबंधित यंत्रणांच्या समन्वयातून वृक्षारोपणाची प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे.

आज एमआयडीसी कार्यालय बारामती आणि रोटरी कल्ब, दौंड यांच्या संयुक्त विद्यमाने दौंड तालुक्यातील कुरकुंभ एमआयडीसी परिसरात दोन हजार वृक्षांची लागवड करण्यात आली, आगामी काळातही एमआयडीसी आणि सेवाभावी संस्था यांच्यासमवेत अधिकप्रमाणात वृक्ष लागवड करण्यात येणार आहे, अशी माहिती श्री.पाटील यांनी दिली आहे.

## अंगणवाडीच्या पोषण आहारात बदल; आता शाकाहारी पुलाव

**जिल्ह्यात ग्रामीण भागातील ४ हजार ३९५ अंगणवाड्यातील लाभार्थ्यांना लाभ**

■ पुणे (दै. संध्या)

महिला व बालविकास विभागाने अंगणवाडीतील घरपोच पोषण आहार योजनेत महत्त्वाचे बदल केले असून, माहे नोव्हेंबर व डिसेंबर २०२६ पासून सुधारित पाककृतींचा पुरवठा केला जाणार आहे. बालके, गरोदर महिला आणि स्तनदा मातांना अधिक पौष्टिक, रुचकर व दर्जेदार आहार मिळावा, यासाठी शाकाहारी (व्हेज) पुलाव, बहुधान्य पौष्टिक पफ यांचा समावेश करण्यात आला असून खिचडीसोबत स्वतंत्र मसाल्याचे पाकीटही देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हा परिषदेचे महिला व बालकल्याण विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी आनंद खंडागळे यांनी दिली आहे.

> जिल्ह्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजनेअंतर्गत ग्रामीण भागात ४ हजार ३९५ अंगणवाड्या कार्यरत आहेत. या केंद्रांमार्फत जवळपास १ लाख ६ हजार बालके, तसेच गरोदर महिला आणि स्तनदा माता यांना घरपोच पोषण आहाराचा लाभ दिला जातो. माहे नोव्हेंबर व डिसेंबर-२०२६ महिन्यापासून सुधारित घरपोच पोषण आहाराचा पुरवठा केला जाणार आहे. लाभार्थ्यांना अधिक पौष्टिक व चविष्ट आहार मिळावा, या उद्देशाने व्हेज पुलाव, मल्टीग्रेन न्युट्री पफ आणि स्वतंत्र मसाला पाकिटाचा समावेश करण्यात आला आहे. जिल्ह्यातील सर्व अंगणवाड्यांमध्ये या सुधारित 'खाद्यसूची'नुसार पुरवठा सुनिश्चित करण्यात येईल. **- श्रीमती अंकिता पाटील, सभापती, महिला व बालविकास समिती**

महिला व बालविकास विभागाच्या सुधारित सूचनेनुसार पौष्टिक मूगडाळ खिचडी प्रीमिक्स हा पदार्थ कायम ठेवण्यात आला असून, त्यासोबत स्वतंत्र मसाल्याचे पाकीट दिले जाणार आहे. पौष्टिक तूरडाळ खिचडी प्रीमिक्स ऐवजी आता व्हेज पुलाव उपलब्ध करण्यात येणार आहे. पौष्टिक बहुधान्य-प्रथिन मिश्रण पाककृती पूर्ववत राहणार असून, भरडधान्ययुक्त बहुधान्य-प्रथिन मिश्रण ऐवजी बहुधान्य पौष्टिक पफचा समावेश करण्यात आला आहे. या सुधारित आहाराचा लाभ अंगणवाडीतील बालके, गरोदर महिला व स्तनदा माता यांना मिळणार आहे.

महिला व बालविकास विभागाने घरपोच पोषण आहार योजनेतील पाककृतींमध्ये बदल करण्यामागे लाभार्थ्यांना अधिक पौष्टिक, रुचकर आणि स्वीकारार्ह आहार उपलब्ध करून देण्याचा उद्देश आहे. बालके, गरोदर महिला आणि स्तनदा माता आहार आवडीने खावेत, यासाठी व्हेज पुलाव आणि बहुधान्य पौष्टिक पफ यांचा समावेश करण्यात आला आहे.

## पंढरपूर वारीतील वारकऱ्यांसाठी आरोग्यसेवेचा उपक्रम

■ पुणे (दै. संध्या)




जगातील आघाडीची आयुर्वेदिक उत्पादने उत्पादक कंपनी डाबर इंडिया लिमिटेड यांनी पंढरपूरच्या पवित्र वारीसाठी निघालेल्या वारकऱ्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विशेष सामाजिक उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी मार्गातील विविध ठिकाणी विशेष आयुर्वेदिक आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात आले असून, या शिबिरांमध्ये आरोग्य तपासणी तसेच डाबर रुमाटिल तेलाद्वारे आयुर्वेदिक पाय व पाठीचा मसाज अशा सेवा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत तज्ज्ञ आरोग्यसेवक या शिबिरांमध्ये कार्यरत असून, लाखो वारकऱ्यांना उपचारात्मक, प्रतिबंधात्मक आणि आरोग्यवर्धक सेवा पुरविण्यात येत आहेत. महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या धार्मिक परंपरांपैकी एक असलेली आषाढी एकादशी वारी सोलापूर जिल्ह्यातील चंद्रभागा नदीच्या तीरावर वसलेल्या पंढरपूर येथे येऊन समाप्त होते. भगवान विठोबाचे प्रमुख तीर्थक्षेत्र असलेल्या पंढरपूरमध्ये दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. डाबर इंडिया लिमिटेडचे एथिकल मार्केटिंग प्रमुख डॉ. दुर्गा प्रसाद म्हणाले, "१४५ वर्षांहून अधिक समृद्ध परंपरा लाभलेल्या डाबरसाठी देशभरातून येणाऱ्या ५० लाखांहून अधिक वारकऱ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे आणि त्यांच्या वारीला हातभार लावणे ही अभिमानाची बाब आहे.

# पुण्यात 'एक्सक्लुझिव्ह ब्रँड स्टोअर' सुरू

■ पुणे (दै. संध्या)



वेगाने वाढणारा भारतीय किचन आणि बाथरूम फिटिंग्ज ब्रँड 'रुहे' (Ruhe) ने आज पुण्यात आपल्या 'एक्सक्लुझिव्ह ब्रँड स्टोअर'चे — 'चामुंडा किट-बाथ स्टुडिओ'चे — उद्घाटन जाहीर केले. हे स्टोअर आदर्श नगर, बीआरटी रोड, कालेवाडी, पिंपरी-चिंचवड येथे स्थित असून, सोमवार, २० जुलै २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजल्यापासून ग्राहकांसाठी खुले होत आहे. भारतातील ब्रँडच्या ऑफलाइन रिटेल विस्तारातील हा एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे.

उद्घाटन समारंभात फीत कापण्याचा कार्यक्रम, स्टोअरची पाहणी आणि अधिकृत डीलरशिप प्रमाणपत्राचे वितरण करण्यात आले. त्यानंतर पुणे परिसरातील इन्फ्लुएन्सर्स, वास्तुविशारद, इंटिरिअर डिझाइनर्स आणि उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांसोबत संवाद व नेटवर्किंग सत्रे आयोजित करण्यात आली.

या प्रसंगी बोलताना 'रुहे'चे संस्थापक श्री. कपिल गुप्ता म्हणाले: "हे केवळ एक नवीन स्टोअर नाही, तर 'रुहे'च्या 'क्विक-कॉमर्स रिटेल मॉडेल'चे हे पहिले पाऊल आहे. 'चामुंडा किट-बाथ स्टुडिओ' हे 'रुहे'चे 'डिस्प्ले स्टोअर' म्हणून काम करेल. येथे आमचे डीलर भागीदार केवळ मर्यादित साठा (इन्व्हेंटरी) ठेवतील, तर ग्राहकांची मागणी थेट भिवंडी (मुंबई) आणि अहमदाबाद येथील आमच्या गोदामांमधून (वेअरहाऊस) पूर्ण केली जाईल. पुणे हे या दोन केंद्रांच्या मध्ये मोक्याच्या ठिकाणी असल्याने, या मॉडेलची सुरुवात करण्यासाठी हे शहर अत्यंत योग्य आहे. यामुळे आमच्या डीलर्सना मोठ्या प्रमाणात साठा करून ठेवण्याच्या ओझ्यापासून मुक्ती मिळते, ग्राहकांना नेहमीच कारखान्यातून थेट आलेला ताजा माल मिळतो आणि स्टोअरला त्यांच्या मुख्य कामावर — म्हणजेच लोकांना आमच्या उत्पादनांचा अनुभव घेण्यास मदत करण्यावर — लक्ष केंद्रित करता येते. पिंपरी-चिंचवडमध्ये रिटेलची ही नवीन पद्धत आणताना श्री. सुनील शिंदे यांच्यासोबत भागीदारी करताना आम्हाला खूप आनंद होत आहे."

'चामुंडा किट-बाथ स्टुडिओ'चे डीलर श्री. सुनील पांडुरंग शिंदे यांनी पुढे सांगितले: "पिंपरी-चिंचवडमधील ग्राहक आता अशा उत्पादनांच्या शोधात आहेत ज्यात आधुनिक डिझाइन आणि दीर्घकाळ टिकणारी कार्यक्षमता यांचा संगम असेल, आणि 'रुहे' नेमके तेच प्रदान करते. आपल्या गुणवत्तेवर ठाम विश्वास असलेल्या ब्रँडसोबत भागीदारी केल्यामुळे मला खूप आत्मविश्वास वाटतो." चामुंडा किट-बाथ स्टुडिओमध्ये, आमचा उद्देश ग्राहक, प्लंबर आणि डिझाइनर्सना एक अशी जागा उपलब्ध करून देणे आहे, जिथे ते निर्णय घेण्यापूर्वी संपूर्ण उत्पादन श्रेणी पाहू, स्पर्श करू आणि अनुभवू शकतील — आणि प्रत्येक खरेदीला विश्वसनीय सेवेची जोड देणे आहे. लॉंच सोहळ्याचा एक भाग म्हणून, रुहे २१ जुलै २०२६ रोजी स्टोअरमध्ये एक विशेष 'प्लंबर्स मीट' आयोजित करणार आहे, ज्यामध्ये उत्पादनांची थेट प्रात्यक्षिके आणि प्रत्यक्ष प्रशिक्षण सत्रे असतील. हा उपक्रम व्यावसायिक प्लंबिंग समुदायासोबत मजबूत आणि दीर्घकाळ टिकणारे संबंध निर्माण करण्याच्या रुहेच्या वचनबद्धतेची पुष्टी करतो — जो ब्रँडच्या बाजारपेठ प्रवेश दृष्टिकोनाचा एक आधारस्तंभ आहे.

> पुण्यातील हा लाँच रुहेच्या व्यापक रिटेल विस्तार धोरणाचा एक भाग आहे, ज्याचा उद्देश भारतातील प्रमुख शहरांमध्ये अनुभवात्मक ब्रँड स्टोअर्स उभारून आपल्या मजबूत डिजिटल-फर्स्ट उपस्थितीला पूरक ठरणे आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### लोणी काळभोर पोलीस स्टेशनच्यावतीने महाविद्यालयात सुरक्षा जनजागृती कार्यक्रम

लोणी काळभोर (दैनिक संध्या) : लोणी काळभोर पोलीस स्टेशन, पुणे शहर यांच्या वतीने श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमामध्ये इयत्ता ११ वी व १२ वीच्या विद्यार्थ्यांना अंमली पदार्थांचे दुष्परिणाम, त्यापासून दूर राहण्याचे महत्त्व, महिला सुरक्षा, तसेच वाढत्या सायबर गुन्ह्यांपासून बचाव करण्यासाठी आवश्यक खबरदारी, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, ऑनलाइन फसवणूक टाळण्याचे उपाय याविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांनीही विविध प्रश्न विचारून मार्गदर्शनाचा लाभ घेतला. लोणी काळभोर पोलीस स्टेशनतर्फे युवक-युवतींमध्ये कायद्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी तसेच अंमली पदार्थमुक्त समाज घडविण्यासाठी अशा जनजागृती उपक्रमांचे आयोजन नियमितपणे करण्यात येत असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमास लोणी काळभोर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रदिप पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मेहेर, महिला पोलीस अंमलदार थोरात सायबर विभाग यांनी आयोजित केला.सदर महाविद्यालयाचे प्राचार्य घोडके सर, महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग तसेच सुमारे ९० ते १०० विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.शिवाजी गायकवाड सर यांनी केले.

### चाकण येथे गुरुवारी रक्तदान शिबिर

चाकण (दैनिक संध्या) : रक्ताचा तुटवडा भासू नये म्हणून रक्त संकलित करण्याकरता चाकण येथे गुरुवारी (दि.२३) भव्य रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. पुणे - नाशिक महामार्गावरील चाकण येथील ग्रँड सेंटर मध्ये वरील नियोजित दिवशी सकाळी दहा ते सायंकाळी पाच या वेळेत या रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रक्तदात्यांचा यावेळी शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व सन्मानपत्र तसेच आकर्षक रेनकोट देऊन गौरव करण्यात येणार असल्याची माहिती उद्योजक भगवान मेदनकर यांनी दिली.

### उरुळी कांचन परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण



उरुळी कांचन (दैनिक संध्या) : उरुळी कांचन परिसरात चोऱ्यांच्या घटना दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. मंगळवार (ता. २१ जुलै) रोजी मध्यरात्री सुमारे २.३० वाजण्याच्या दरम्यान पुणे–सोलापूर महामार्गालगतची भर चौकातील श्री चक्रधर डेअरी वर चोरट्यांनी धाडसी डल्ला मारत शटर उचकटून आत प्रवेश केला. चोरट्यांनी डेअरीतील सुमारे ६० हजार रुपयांच्या दरम्यान रोकड लंपास केली असुन दुकानातील सुमारे २ ते ३ हजार रुपयांच्या कॅडबरी चॉकलेट्सही चोरी करून नेल्याची माहिती डेअरी मालक बंटी कांचन यांनी दिली आहे. या संपूर्ण चोरीची घटना दुकानात बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली असून, त्यामध्ये तीन चोर स्पष्टपणे दिसत आहेत. चोरांनी काही मिनिटांतच चोरी करून घटनास्थळावरून पलायन केले. उरुळी कांचन परिसरात यापूर्वीही मोटारसायकल चोरी, वाहनांच्या बॅटऱ्या आणि इतर गुन्ह्यांच्या घटना घडल्या आहेत. आता महामार्गालगतच्या डेअरीवर झालेल्या या चोरीमुळे व्यापाऱ्यांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे. सीसीटीव्हीच्या आधारे पोलिसांनी तातडीने आरोपींचा शोध घेऊन त्यांना अटक करावी, तसेच उरुळी कांचन परिसरात रात्रीची पोलिस गस्त वाढवावी, अशी मागणी व्यापारी व नागरिकांकडून केली जात आहे.

### संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात पुणे जिल्ह्याची दुहेरी बाजी

मंचर (दैनिक संध्या) : संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान २०२५-२६ अंतर्गत विभागस्तरीय स्पर्धेत पुणे जिल्ह्याने दुहेरी यश मिळवत मानाचा तुरा रोवला आहे. जुन्नर तालुक्यातील काळवाडी ग्रामपंचायतीने विभागात प्रथम क्रमांक पटकावत १२ लाख रुपयांचे पारितोषिक मिळविले, तर खेड तालुक्यातील कडाचीवाडी ग्रामपंचायतीला डॉ. बाबासाहेब आंबेडकर पाणीपुरवठा व पाणी व्यवस्थापन विशेष पुरस्कार आणि ७५ हजार रुपयांचे पारितोषिक जाहीर झाले आहे. अशी माहिती पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी दिली. विभागीय स्पर्धेत काळवाडी ग्रामपंचायतीने ग्रामस्वच्छता, लोकसहभाग, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकास या सर्व निकषांवर उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांकाचा मान पटकावला.

# नवी मुंबई विमानतळावरून अबू धाबीसाठी थेट सेवा सुरू

नवी दिल्ली (दै. संध्या) :

- एअर इंडिया एक्सप्रेसची आठवड्यातून तीन दिवस थेट सेवा
- देशांतर्गत सेवा सुरू झाल्यानंतर अवघ्या २०० दिवसांत आंतरराष्ट्रीय उड्डाणांना प्रारंभ
- आतापर्यंत २३ लाखांहून अधिक प्रवाशांना सेवा; ४६ देशांतर्गत शहरांशी जोडणी



अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेड (एएएचएल) संचलित नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून (एनएमआयए) नियोजित आंतरराष्ट्रीय विमानसेवेला प्रारंभ झाला असून, एअर इंडिया एक्सप्रेस १५ जुलैपासून नवी मुंबई–अबू धाबी मार्गावर आठवड्यातून तीन दिवस थेट उड्डाण सेवा सुरू करणार आहे.

२५ डिसेंबर २०२५ रोजी देशांतर्गत सेवा सुरू झाल्यानंतर अवघ्या २०० दिवसांतच विमानतळाने आंतरराष्ट्रीय सेवेचा टप्पा गाठला आहे. या सेवेमुळे मुंबई महानगर प्रदेशातील प्रवाशांना संयुक्त अरब अमिरातीच्या राजधानी अबू धाबीसाठी थेट आणि अधिक सोयीस्कर हवाई संपर्क उपलब्ध होणार आहे. तसेच, अदानी एअरपोर्ट होल्डिंग्जच्या अखत्यारीतील सर्व विमानतळ आता आंतरराष्ट्रीय सेवांशी जोडले गेले आहेत.

अदानी एअरपोर्ट होल्डिंग्ज लिमिटेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी अरुण बन्सल म्हणाले की, "नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रवासातील हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. राज्य आणि केंद्र सरकारच्या विविध यंत्रणा, नियामक संस्था तसेच सर्व भागधारकांच्या सहकार्यामुळे हे शक्य झाले. पहिल्या आंतरराष्ट्रीय मार्गासाठी एअर इंडिया एक्सप्रेसने दिलेल्या सहकार्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. येत्या काळात अधिक विमान कंपन्या आणि नव्या आंतरराष्ट्रीय गंतव्यांचा समावेश करत जागतिक दर्जाचा प्रवास अनुभव देण्यावर आमचा भर राहील."

एअर इंडिया एक्सप्रेसचे अध्यक्ष निपुण अग्रवाल म्हणाले की, "नवी मुंबई विमानतळावरून अबू धाबीसाठी थेट सेवा सुरू करताना आम्हाला आनंद होत आहे. या मार्गामुळे मुंबई महानगर प्रदेशातील प्रवाशांना यूएईसाठी आणखी एक सोयीस्कर पर्याय उपलब्ध होईल. आमच्या दुहेरी विमानतळ धोरणात नवी मुंबई विमानतळाची महत्त्वाची भूमिका असून, या भागीदारीतून भविष्यात आणखी व्यापक हवाई संपर्क निर्माण करण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत."

अवघ्या सात महिन्यांत नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाने ४६ देशांतर्गत शहरांशी हवाई संपर्क प्रस्थापित करत २३ लाखांहून अधिक प्रवाशांना सेवा दिली आहे. सध्या या विमानतळावर दररोज सुमारे १५० हवाई वाहतूक हालचाली होत आहेत.

पहिल्या आंतरराष्ट्रीय उड्डाणाद्वारे नाशवंत वस्तूंच्या पहिल्या आंतरराष्ट्रीय निर्यात मालवाहतुकीलाही सुरुवात झाली आहे. त्यामुळे भारतीय निर्यातदारांना जागतिक बाजारपेठेत अधिक वेगाने पोहोचण्याची संधी उपलब्ध होणार असून, विमानतळाच्या मालवाहतूक क्षमतेलाही नवी दिशा मिळणार आहे.

अबू धाबी हा नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील पहिला आंतरराष्ट्रीय मार्ग असून, लवकरच आणखी अनेक आंतरराष्ट्रीय गंतव्ये या जाळ्यात समाविष्ट होणार आहेत. त्यामुळे मुंबईच्या वाढत्या हवाई वाहतूक क्षमतेला बळ मिळण्यासह भारताच्या आंतरराष्ट्रीय संपर्क, व्यापार आणि पर्यटनालाही चालना मिळणार आहे.

## जेजुरी देवसंस्थानला माल वाहतुकीसाठी महिंद्रा पिकअप गाडी भेट



जेजुरी (दै. संध्या) :

सोमा न्यूट्रिशियन लॅब्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या सौजन्याने जेजुरी येथील श्री मार्तंड देवसंस्थानला माल वाहतुकीसाठी महिंद्रा पिकअप गाडी देणगी स्वरूपात प्रदान करण्यात आली. या गाडीचा लोकार्पण सोहळा मंगळवार दिनांक 21 रोजी श्रीक्षेत्र जेजुरी गडावर उत्साहात संपन्न झाला. यावेळी श्री मार्तंड देवसंस्थानच्या वतीने सोमा न्यूट्रिशियन लॅब्स प्रायव्हेट लिमिटेडचे हेमंत पाठक यांचा सपत्नीक पूजा विधी व सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास न्यासाचे अध्यक्ष ॲड. श्री. विश्वास पानसे, विश्वस्त अनिल सौंदडे तसेच देवसंस्थानचे अधिकारी, कर्मचारी, पुजारी आणि सेवेकरी उपस्थित होते.

## ठाणे जिल्ह्यातील शालेय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनास सुरुवात

भिवंडी (दै. संध्या) :



ठाणे जिल्ह्यातील सन २०२६-२७ या वर्षातील शालेय क्रीडा स्पर्धांच्या आयोजनास औपचारिक सुरुवात झाली असून, या स्पर्धांचे बिगुल वाजले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी तथा जिल्हा क्रीडा परिषदेचे अध्यक्ष डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा क्रीडा परिषदेची महत्त्वाची बैठक संपन्न झाली.

या बैठकीमध्ये आगामी तालुका, जिल्हा, विभागीय आणि राज्यस्तरीय शालेय क्रीडा स्पर्धांचे अत्यंत प्रभावी आयोजन, सुटसुटीत नियोजन व कडक अंमलबजावणी करण्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. आगामी स्पर्धा सर्व दृष्टीने यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी आवश्यक पूर्वतयारी करणे, विविध सरकारी व क्रीडा विभागांमध्ये उत्तम समन्वय राखणे, स्पर्धास्थळांची योग्य तयारी करणे आणि सहभागी खेळाडूंना आवश्यक त्या सर्व सोयी-सुविधा पुरवणे या बाबींना प्राधान्य देण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिले. तसेच सर्व स्पर्धा वेळेत आणि अत्यंत नियोजनबद्ध रीतीने पार पाडण्याबाबत त्यांनी उपस्थित अधिकारी व सदस्यांना मार्गदर्शन केले.

जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थी-खेळाडूंना या स्पर्धांमध्ये सहभागी करून घेण्यासाठी जिल्ह्यातील सर्व शाळा, क्रीडा संघटना आणि संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. दर्जेदार व गुणवत्तापूर्ण आयोजनाच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील क्रीडापटूंना राज्य व राष्ट्रीय स्तरावर उत्तुंग कामगिरी करण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करण्यावर या बैठकीत विशेष भर देण्यात आला.

या बैठकीस जिल्हा क्रीडा परिषदेचे अध्यक्ष तथा जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के, ठाणे ग्रामीणच्या पोलीस उपअधीक्षक श्रीमती निलम वाव्हळ, माध्यमिक विभागाचे उपशिक्षणाधिकारी श्री. भाऊराव मोहिते, प्राथमिक शिक्षण विभागाचे प्रतिनिधी श्री. अनिल कुऱ्हाडे, जिल्हा ॲथलेटिक्स संघटनेचे सचिव श्री. अशोक आहेर, जिल्हा खो-खो संघटनेचे प्रतिनिधी श्री. विकास कोळी व श्री. कमलाकर कोळी, जिल्हा क्रीडा परिषदेचे सर्व सदस्य तसेच जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातील संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

## सोमेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय येथे 'विठ्ठल हरी नामाचा गजर

सोमेश्वरनगर (दै. संध्या) :



बारामती तालुक्यातील सोमेश्वर विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, सोमेश्वरनगर येथे आषाढी एकादशीचे औचित्य साधून 'विठ्ठल हरी नामाचा गजर... आनंद दिंडीचा' या सांस्कृतिक व आध्यात्मिक उपक्रमाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. याप्रसंगी अभिरुप गोल रिंगण सोहळा विशेष ठरला. संपूर्ण विद्यालय परिसर विठ्ठलनामाच्या गजराने, अभंगांच्या सुरांनी आणि वारकरी संस्कृतीच्या भक्तिमय वातावरणाने भारावून गेला. कार्यक्रमाची सुरुवात संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज आणि श्री विठ्ठल-रुक्मिणी यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलनाने झाली. त्यानंतर संतांच्या विविध अभंगाचे गायन पार पडले. विद्यार्थ्यांनी पारंपरिक वारकरी वेशभूषा स्पर्धा पार पडली. यानंतर विठू माऊली, रखुमाई माझी, अलंकापुरी अशा गाण्यांवर विद्यार्थ्यांनी नृत्ये सादर केली.

यानंतर टाळ-मृदुंगाच्या गजरात आनंद दिंडी काढली. दिंडीत हरिनामाचा अखंड गजर करण्यात आला. याप्रसंगी संत सोपानकाका यांच्या रिंगण सोहळ्याप्रमाणे गोल रिंगण सोहळा पार पडला. यामध्ये वारकरी वेशभूषेत असलेले विद्यार्थी यांच्यासोबत शिक्षक, शिक्षिका यांनीही रिंगणातून धावण्याचा आनंद घेतला. अशा पद्धतीने संतांच्या विचारांवर आधारित विविध सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी तसेच सर्व विभागांनी मनापासून सहकार्य केले. विद्यार्थ्यांनीही अत्यंत शिस्तबद्ध व उत्साहपूर्ण सहभाग नोंदवत कार्यक्रमाची शोभा वाढवली. विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसाने न्हाऊन निघाला. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना महाराष्ट्राच्या समृद्ध वारकरी परंपरेची ओळख, संतांचे विचार आणि सामाजिक ऐक्याचे महत्त्व अनुभवण्याची संधी मिळाली.

मुख्याध्यापक पी. बी. जगताप व पर्यवेक्षक जी.आर. इंगळे सर कार्यालयीन लेखनिक एस .एम. वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळा पार पडला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुजाता जगताप यांनी केले सूत्रसंचालन राजेंद्र झूरंगे सर शेवटी उपस्थितांचे आभार विश्वास पवार यांनी मानले.

## बंधारा पाण्याने तुडूंब भरलेला असताना शिरूर शहरात कृत्रिम पाणीटंचाई

शिरूर (दै. संध्या) :

ज्या घोडनदीवरील कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यावरून शहराची पाणीपुरवठा योजना राबविली आहे, तो बंधारा पाण्याने तुडूंब भरलेला असताना आणि गेले दोन दिवस शहर व परिसरात दमदार पावसाने हजेरी लावली असतानाही शहरवासियांना मात्र सलग दोन दिवस पाण्यावाचून काढावे लागले. या कृत्रिम पाणीटंचाईला शहराच्या पाणीपुरवठा योजनेतील जुनी पाईप लाईन फुटण्याचे कारण दिले जात असले; तरी पाणीपुरवठ्यासारख्या महत्वाच्या विषयातील नगर परिषदेचे अनियोजन, अनास्थेबरोबरच कुठलीही खबरदारी किंवा पूर्वतयारी नसल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.



शिरूर शहर व परिसराला नगर परिषदेच्या पाणीपुरवठा योजनेतून पाणी पुरविले जाते. मात्र, रविवारी (ता. १९) रात्री नऊच्या दरम्यान नगर परिषदेमार्फत सोशल मिडीयावर मेसेज टाकून, शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मुख्य पाईप लाईनचा मेंटेनन्स करण्यासाठी सोमवारी पाणीपुरवठा करता येणार नसल्याचे कळविण्यात आले. याबाबत काही सजग नागरीकांनी वस्तुस्थिती जाणून घेतली असता शहराच्या पाणीपुरवठा योजनेतील मुख्य पाईप लाईन मोतीनाला परिसरात फुटली असल्याचे समजले.

# ‘अगं आई अहो आई’मधून उलगडणार कौटुंबिक नात्यांची हळवी वीण

नवी दिल्ली (दै. संध्या) :



Zee5 मराठीने ‘अगं आई अहो आई’ या आपल्या आगामी ओरिजिनल सीरिजचा अधिकृत ट्रेलर प्रदर्शित केला आहे. हता दुर्गुळे, रेणुका शहाणे आणि निर्मिती सावंत यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या या सीरिजमध्ये कुटुंब, नाती आणि मायेचा सुंदर प्रवास उलगडून दाखविण्यात आला आहे. वरुण नार्वेकर यांनी या सीरिजचे दिग्दर्शन केले असून, कल्याणी पंडित यांनी लेखन केले आहे. जिओ स्टुडिओज, बहावा एंटरटेन्मेंट आणि प्रतिसाद प्रॉडक्शन्स यांनी या सीरिजची निर्मिती केली आहे. मुलगी, तिची आई आणि सासू यांच्यातील हळुवार आणि क्वचितच पडद्यावर पाहायला मिळणाऱ्या नात्याचा वेगळा पैलू या सीरिजमध्ये पाहायला मिळणार आहे. प्रेमाने आणि आपुलकीने कुटुंब अधिक घट्ट जोडले जाते, हाच संदेश ही सीरिज देते. 'अगं आई अहो आई'चा प्रीमियर 24 जुलै 2026 रोजी केवळ Zee5 मराठीवर होणार आहे.

‘अगं आई अहो आई’ ही नाती, स्वीकार आणि माणसांच्या परस्परांशी असलेल्या बंधांची गोष्ट आहे. पुणे आणि कोल्हापूर या दोन वेगळ्या वातावरणांच्या पार्श्वभूमीवर ही कथा घडते. लग्नानंतर एका नवविवाहित तरुणीचा नव्या कुटुंबात स्वतःचे स्थान शोधण्याचा प्रवास या सीरिजमध्ये उलगडून दाखवण्यात आला आहे. या प्रवासात बदलणारी नाती, भावनिक टप्पे आणि नव्या अनुभवांना ती सामोरी जाते. लग्नानंतर प्रत्येक मुलीसमोर एक न बोलला जाणारा प्रश्न उभा राहतो. जन्मदात्या आईचे नाते जपत नव्या आईला कसे स्वीकारायचे? ‘अगं आई अहो आई’ सीरीजमध्ये या प्रश्नाकडे एका वेगळ्या नजरेतून पाहण्यात आले आहे. स्पर्धा, अपेक्षा किंवा नात्यांमधील ओढाताण न दाखवता, एका स्त्रीला या दोघींमधून कोणाचीही निवड करावी लागत नाही, हे ही सीरिजमध्ये दाखवण्यात आले आहे. तिची आई आणि सासू यांच्यातील जिव्हाळ्याच्या नात्यामुळे एक आई गमावल्याची भावना न राहता, आणखी एक आई मिळाल्याचा आनंद तिच्या वाट्याला येतो. सहज वाटणारी पात्रे आणि मनाला स्पर्श करणाऱ्या प्रसंगांमधून सहानुभूती, विश्वास आणि समजूतदारपणा यामुळे केवळ घर नव्हे, तर खऱ्या अर्थाने कुटुंब घडते, हे ही सीरिज अधोरेखित करते.

या सीरिजमध्ये नायिकेचा भावनिक प्रवास उलगडून दाखविण्यात आला आहे. पुण्यातील आपले परिचित आयुष्य मागे सोडून ती कोल्हापुरात नव्या आयुष्याची सुरुवात करते. नव्या परंपरा, नवी माणसे आणि नव्या अपेक्षांशी जुळवून घेत असताना ती आपल्या नव्या कुटुंबाशी हळूहळू अर्थपूर्ण नाते जोडते. सहानुभूती आणि परस्पर आदर यांच्या आधारावरच स्वीकार मिळतो, याची तिला जाणीव होत जाते. सून आणि सासू यांच्यात हळूहळू फुलत जाणारे नाते या कथेच्या केंद्रस्थानी आहे. सुरुवातीला संकोच आणि अनिश्चिततेने सुरू झालेले हे नाते पुढे मैत्री, आधार आणि समजूतदारपणावर उभे राहते. त्यामुळे सासू-सुनेच्या नात्याबद्दलच्या पारंपरिक समजुतींना ही सीरिज छेद देते. नायिकेची आई आणि सासू यांच्यातील जिव्हाळ्याची मैत्रीदेखील या सीरिजमध्ये अधोरेखित करून दाखवली आहे. त्यामुळे आधुनिक कौटुंबिक नातेसंबंधांचा एक सकारात्मक पैलू समोर येतो.

झी मराठीच्या चीफ चॅनेल ऑफिसर आणि Zee5 मराठीच्या बिझनेस हेड हेमा व्ही. आर. म्हणाल्या, “Zee5 मराठीमध्ये आम्हाला नेहमीच बदलत्या वास्तवाचे प्रतिबिंब दाखवणाऱ्या कथा सांगण्यावर विश्वास आहे. ‘हे काय नवीन?’ या सीरिजनंतर वरुण नार्वेकर यांच्यासोबत पुन्हा काम करताना आम्हाला आनंद होत आहे. आजच्या मराठी प्रेक्षकांची नाडी अचूक ओळखणारे ते संवेदनशील दिग्दर्शक आहेत. ‘अगं आई अहो आई’ ही केवळ एक कौटुंबिक कथा नाही. पूर्वग्रह आणि ठरावीक समजुतींपलीकडे फुलणाऱ्या नात्यांचा हा उत्सव आहे. सहानुभूती, विश्वास आणि परस्पर आदर यांच्या आधारावर सासू-सुनेच्या नात्याकडे नव्या दृष्टिकोनातून पाहणारी ही हळवी कथा आहे. भावना, आपुलकी आणि सहजतेने समृद्ध असलेली ही सीरिज प्रेक्षकांच्या मनाला नक्कीच स्पर्श करेल, असा आम्हाला विश्वास आहे. ही कथा Zee5 मराठीच्या प्रेक्षकांपर्यंत पोहोचवताना आम्हाला विशेष आनंद होत आहे.”

दिग्दर्शक वरुण नार्वेकर म्हणाले, “अनेक वर्षांपासून सासू-सुनेचे नाते पडद्यावर प्रामुख्याने संघर्षाच्या नजरेतून दाखवले गेले आहे. ‘अगं आई अहो आई’मुळे मला एक वेगळी कथा सांगण्याची संधी मिळाली, हीच माझ्यासाठी सर्वात आनंदाची गोष्ट होती. समजूतदारपणा, सहवास आणि भावनिक जडणघडण यांवर आधारलेली ही कथा आहे. कुटुंबातील नाती ही केवळ पारंपरिक भूमिकांनी ठरत नाहीत, तर स्वीकार, आपुलकी आणि जपलेल्या नात्यांमधून ती दररोज घडत जातात, हा विचार या सीरिजमधून मांडण्यात आला आहे.”

रेणुका शहाणे म्हणाल्या, “‘अगं आई अहो आई’मधील सर्वात भावलेली गोष्ट म्हणजे पडद्यावर क्वचितच पाहायला मिळणारे आई आणि सासू यांच्यातील मैत्रीचे नाते. प्रत्येक आईला आपल्या मुलीने आयुष्याच्या नव्या टप्प्यात प्रवेश करताना तिच्यावर प्रेम करणारे, तिला समजून घेणारे आणि तिची काळजी घेणारे माणसे मिळावीत, असे वाटत असते. आपल्या मुलीने एक कुटुंब गमावले नाही, तर तिला आणखी एक कुटुंब आणि कदाचित आणखी एक आई मिळाली आहे, ही भावना ही कथा अतिशय सुंदरपणे मांडते. या दोन महिलांमधील आपुलकी, विश्वास आणि परस्पर आदर यांमुळे ही सीरिज मनाला उब देणारी ठरते. प्रेक्षकांनाही ही कथा आपलीशी वाटेल, असा मला विश्वास आहे.”

निर्मिती सावंत म्हणाल्या, “‘अगं आई अहो आई’बद्दल मला सर्वाधिक आवडलेली गोष्ट म्हणजे अनेक वर्षांपासून रूढ झालेल्या सासू-सुनेच्या नात्याविषयीच्या ठरावीक चौकटीला ही सीरिज छेद देते. संघर्ष, वर्चस्व किंवा अहंकार यांवर भर न देता, सासू आणि सून यांच्यात खऱ्या अर्थाने प्रेमळ आणि जिव्हाळ्याचे नाते निर्माण होऊ शकते, ही शक्यता ती मांडते. लग्न म्हणजे एका मुलीने एक कुटुंब गमावून दुसरे मिळवणे नव्हे, तर तिला आणखी एक आई मिळणे, हा सुंदर विचार ही कथा मांडते. परस्पर समजूतदारपणा, आदर आणि जिव्हाळा हा या नात्यांचा पाया आहे. त्यामुळे ही कथा वेगळी, ताजी आणि मनाला स्पर्श करणारी ठरते. या प्रवासात प्रत्येक क्षणी जाणवणारी सकारात्मकता आणि आपुलकी प्रेक्षकांच्या मनालाही नक्कीच भिडेल.”

हता दुर्गुळे म्हणाली, “या कथेचा प्रामाणिकपणा आणि आजच्या काळाशी असलेली तिची जवळीक मला सुरुवातीपासूनच भावली. लग्नानंतर अनेक तरुणींच्या मनात असणाऱ्या आशा, भीती आणि अनिश्चितता घेऊन मी साकारत असलेली व्यक्तिरेखा नव्या कुटुंबात प्रवेश करते. मात्र, ही कथा नेहमीच्या चौकटीत अडकत नाही. उलट, नव्या कुटुंबात तिला मिळणारा आधार, मैत्री आणि आपलेपणाचा शोध हा तिच्या प्रवासाचा महत्त्वाचा भाग आहे. सासूसोबत ती ज्या सुंदर नात्याची वीण विणते आणि तिच्या भावविश्वात होत जाणारा बदल प्रेक्षकांच्या मनाला नक्कीच स्पर्श करेल, असा मला विश्वास आहे.”

## थोडक्यात पण महत्वाचे...



### एआयसीटी डिझाईन अकादमीच्या विद्यार्थ्यांचा गौरव

चिंचवड (दैनिक संध्या) : आर्किटेक्चर प्रवेश परीक्षांमध्ये चिंचवड येथील एआयसीटी डिझाईन अकादमीच्या विद्यार्थ्यांचा उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या यशस्वी विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. जेईई (B.आर्किटेक्चर) आणि नाटा या राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षांमध्ये संस्थेच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणवत्तेची कामगिरी करत संस्थेचा नावलौकिक उंचावला आहे. यंदाच्या निकालामध्ये कृष्णा कल्याणकर (९९.५७%), गाथा काकडे (९८.६८%) , समिक्षा शिंदे ( ९८.४३%) , मुक्ता महामुनी ( ९८.००%), समृद्धी साबळे (९७.१८%) , वेदिका मुतांगे ( ९५.८९%) , ख्याती खंबायत (९५.१९%), आर्यन हरडे (९५.१२%) तसेच युवराज डागलिया ( ९३.६५%) गुण मिळवले आहे. एआयसीटीच्या वतीने आयोजित केलेल्या 'प्रखर २०२६' या वार्षिक कार्यक्रमात सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मानचिन्ह देवून विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थी, पालक, शिक्षक उपस्थित होते. याप्रसंगी एआयसीटी डिझाईन अकादमीचे संचालक राजेश सप्रा यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सांगितले, "आमच्या विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश संपूर्ण एआयसीटी डिझाईन अकादमी परिवारासाठी अत्यंत अभिमानाची बाब आहे. विद्यार्थ्यांची मेहनत, पालकांचा विश्वास आणि शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच दरवर्षी आमचे विद्यार्थी राष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत आहेत. भविष्यातही विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण प्रशिक्षण देऊन अशाच यशस्वी विद्यार्थ्यांची परंपरा कायम ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.



### वीज पुरवठा वारंवार खंडित, माजी नगरसेविका मिनल यादव आक्रमक

■ तातडीने उपाययोजना करण्याची महावितरणकडे मागणी; तीव्र आंदोलनाचा दिला इशारा

पिंपरी (दैनिक संध्या) : मोहननगर, काळभोरनगर आणि आकुर्डी परिसरात गेल्या सात ते आठ दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या समस्येबाबत माजी नगरसेविका मिनल विशाल यादव यांनी महावितरणकडे निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. मिनल यादव यांनी म्हटले आहे आहे की, परिसरातील नागरिकांना सततच्या वीज खंडित होण्याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. याबाबत महावितरणच्या कर्मचाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केल्यास समाधानकारक उत्तरे मिळत नाहीत तसेच अनेकदा फोनही उचलले जात नसल्याच्या तक्रारी नागरिकांकडून येत आहेत. या पार्श्वभूमीवर मंगळवारी (दि.२१) महावितरणच्या संभाजीनगर येथील कार्यालयात कार्यकारी अभियंता शिर्के व कनिष्ठ अभियंता शिंदे मॅडम यांना निवेदन सादर करण्यात आले. वीजपुरवठा तात्काळ सुरळीत करण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्यात याव्यात, अन्यथा नागरिकांना सोबत घेऊन महावितरण कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. दरम्यान, या निवेदनाची दखल घेत महावितरण प्रशासनाने तातडीने पाऊल उचलले असून पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त विजय सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत महावितरण व महापालिकेच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक दुपारी ३ वाजता आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत वीजपुरवठा खंडित होण्यामागील कारणांचा आढावा घेऊन कायमस्वरूपी तोडगा काढण्याबाबत चर्चा होणार असल्याची माहिती मिनल यादव यांनी दिली आली.





### मेट्रो कामामुळे तीव्र वाहतूक कोंडी; बसस्टॉप तात्पुरता स्थलांतर करण्याची मागणी

पिंपरी (दैनिक संध्या) : निगडी ते पिंपरी मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे काम सुरू असल्याने मुंबई-पुणे महामार्गावरील निगडी येथील मधुकर पवळे उड्डाणपुलाखाली वाहतूक कोंडीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असल्याचा आरोप भाजप कार्यकर्ते सचिन काळभोर यांनी केला आहे. याबाबत त्यांनी पीएमपीएमएल, पिंपरी-चिंचवड महापालिका, मेट्रो प्रशासन आणि वाहतूक पोलिसांकडे तक्रार दाखल करत निगडी बसस्टॉपचे तात्पुरते स्थलांतर भक्ती-शक्ती उद्यानासमोर करण्याची मागणी केली आहे. मेट्रो प्रकल्पाच्या कामासाठी महामार्गाच्या कडेला लोखंडी पत्रे उभारण्यात आल्याने रस्त्याची रुंदी कमी झाली आहे. त्यातच निगडी बसस्टॉपवर पीएमपीएमएल बस, खासगी ट्रॅव्हल्स आणि इतर मोठ्या वाहनांची वर्दळ वाढल्याने वाहतुकीचा खोळंबा होत असल्याचे काळभोर यांनी निवेदनात नमूद केले आहे. या परिसरातून दररोज हजारो नागरिक, शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच दुचाकी व चारचाकी वाहनचालक प्रवास करतात. रस्ता अरुंद झाल्यामुळे वाहतूक व्यवस्था कोलमडून पडत असून अपघाताची शक्यताही वाढली असल्याची चिंता व्यक्त करण्यात आली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, मेट्रो प्रकल्प अधिकारी श्रावण हर्डीकर, पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे आणि वाहतूक पोलिस उपायुक्त देशमुख यांनी तातडीने घटनास्थळी पाहणी करून निगडी बसस्टॉप भक्ती-शक्ती उद्यानासमोर स्थलांतरित करण्याबाबत निर्णय घ्यावा, अशी मागणी सचिन काळभोर यांनी केली आहे. दरम्यान नागरिकांना विनाकारण त्रास होऊ नये तसेच भविष्यातील अपघात टाळण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली आहे.

# विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण होणार : महापौर रवि लांडगे

भोसरी (दै. संध्या)

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या इंग्लिश मीडियम शाळा, भोसरी येथे आसरा सोशल फाउंडेशन, पुणे यांच्या सहकार्याने राबविण्यात येत असलेल्या 'शून्य कचरा शाळा' प्रकल्पाला पिंपरी-चिंचवड शहराचे महापौर रवि लांडगे यांनी भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला. यावेळी विद्यार्थ्यांशी पर्यावरण संवर्धन, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, पुनर्वापर, पुनर्निर्मिती आणि स्वच्छतेच्या सवयी लहानपणापासूनच अंगीकारण्याच्या महत्त्वाविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. शून्य कचऱ्याची संकल्पना प्रत्यक्ष कृतीतून विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे




मत महापौर रवि लांडगे यांनी व्यक्त केले. महापौर रवि लांडगे म्हणाले, "स्वच्छ, सुंदर आणि पर्यावरणपूरक पिंपरी-चिंचवड घडविण्यासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक आहे. त्याची सुरुवात विद्यार्थ्यांपासून झाली तर भविष्यात पर्यावरणाबाबत संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडतील. शाळांमध्ये राबविण्यात येणारे असे उपक्रम स्वच्छतेची सवय, कचरा व्यवस्थापनाची जाणीव आणि पर्यावरण संरक्षणाची भावना अधिक दृढ करतात. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घरात आणि परिसरातही शून्य कचऱ्याचा संदेश पोहोचवावा."

यावेळी विद्यार्थ्यांनी शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध पर्यावरणपूरक उपक्रमांची माहिती दिली. कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, ओला व सुका कचरा वर्गीकरण, पुनर्वापर आणि स्वच्छ परिसर राखण्याबाबत विद्यार्थ्यांनी घेतलेल्या पुढाकाराचे महापौरांनी कौतुक केले.

या प्रसंगी आसरा सोशल फाउंडेशन, पुणे यांच्या अर्चना मोरे, शाळेच्या मुख्याध्यापिका विनिता डिसुजा, शिक्षक, कर्मचारी तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## 'रेवाडेंट' मल्टीस्पेशालिटी डेंटल क्लिनिकचे उद्घाटन

पिंपरी (दै. संध्या)



पिंपळे सौदागर परिसरातील नागरिकांना अत्याधुनिक दंतवैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणाऱ्या 'RevaDent' मल्टीस्पेशालिटी डेंटल क्लिनिकचे उद्घाटन नुकतेच उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. प्रसिद्ध रूट कॅनाल तज्ज्ञ डॉ. जय भोपटकर (BDS, MDS Endodontics) यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या क्लिनिकमुळे परिसरातील नागरिकांना जागतिक दर्जाच्या दंतसेवा एकाच छताखाली मिळणार आहेत. या उद्घाटन सोहळ्यास भाजप पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, माजी विरोधी पक्षनेते विठ्ठल उर्फ नाना काटे, उद्योजक संदीप काटे, युवा नेते उमेश काटे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी उपस्थितांनी डॉ. जय भोपटकर आणि भोपटकर परिवाराचे अभिनंदन करत नव्या उपक्रमासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी बोलताना शत्रुघ्न काटे म्हणाले, "पिंपळे सौदागर हा आरोग्याबाबत जागरूक नागरिकांचा परिसर आहे. डॉ. जय भोपटकर यांच्यासारख्या तज्ज्ञ डॉक्टरांनी सुरू केलेल्या या मल्टीस्पेशालिटी क्लिनिकमुळे स्थानिक नागरिकांना, विशेषतः ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांना दंत उपचारांसाठी दूर जाण्याची आवश्यकता राहणार नाही. 'प्रिसिजन, केअर अँड एक्सलन्स' या ध्येयवाक्यासह सुरू झालेली ही सेवा परिसरासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल."

## ग्रामस्थांसह महापौर यांचा पाठपुरावा

पिंपरी (दै. संध्या)

■ दुर्घटनाग्रस्तांना न्याय, दोषींवर कठोर कारवाई आणि मोशीतील प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावण्याचे आश्वासन

मोशी येथील वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्प परिसरात घडलेल्या दुर्दैवी दुर्घटनेनंतर नागरिकांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता, परिसरातील सुरक्षिततेचे प्रश्न आणि ग्रामस्थांच्या प्रलंबित मागण्यांच्या अनुषंगाने आज पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि लांडगे यांच्या पुढाकाराने मोशी ग्रामस्थांची महत्त्वपूर्ण बैठक पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या समवेत पार पडली. बैठकीमध्ये मोशी ग्रामस्थांनी दुर्घटनेनंतर निर्माण झालेल्या परिस्थितीचा सविस्तर आढावा मांडत, मृतांच्या कुटुंबियांना न्याय मिळणे, दोषींवर कठोर कारवाई, परिसरातील नागरिकांच्या सुरक्षिततेची खात्री, कचरा डेपोमुळे होणारे आरोग्यविषयक व पर्यावरणीय दुष्परिणाम तसेच अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या स्थानिक प्रश्नांबाबत आपल्या भावना आणि मागण्या स्पष्टपणे मांडल्या. ग्रामस्थांनी प्रत्येक मागणीची सखोल मांडणी करत ही घटना केवळ एका दुर्घटनेपुरती मर्यादित नसून नागरिकांच्या सुरक्षितता, पर्यावरण आणि प्रशासनावरील विश्वासाशी संबंधित अत्यंत गंभीर बाब असल्याचे नमूद केले. मोशीकरांच्या न्याय्य मागण्यांवर कोणतीही तडजोड होणार नसून प्रशासनाने याकडे सर्वोच्च प्राधान्याने पाहण्याची आवश्यकता असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## जंजीरा किल्ल्यावर सरकारने भगवा झेंडा लावावा अन्यथा आंदोलन

### डॉ. श्रमिक गोजमगुंडे : जंजीरा किल्ल्यावर भगवा झेंडा लावावा यासाठी जनजागृती सुरू - कुणाल साठे

पिंपरी (दै. संध्या)

जंजीरा किल्ल्यावर सरकारने सन्मानाने भगवा झेंडा लावावा त्याची कायम रक्षण, देखभाल करण्याची जबाबदारी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान या संस्थेच्या वतीने घेण्यात येईल. तसेच पुढील तीन महिन्यात येथे भगवा झेंडा सरकारने लावला पाहिजे, यासाठी केंद्रीय सांस्कृतिक मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांच्या कडे भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या मार्फत परवानगी मिळावी यासाठी प्रयत्न सुरू आहेत. सरकारने तीन महिन्यात परवानगी द्यावी अन्यथा केंद्रीय पुरातत्व विभागाच्या कार्यालयासमोर पुन्हा तीव्र आंदोलन करू असा इशारा




सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान संस्थेचे संस्थापक डॉ. श्रमिक गोजमगुंडे यांनी दिला. सोमवारी, पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी संस्थेचे पुणे जिल्हा अध्यक्ष कुणाल साठे, राज्य संपर्क प्रमुख गौरव शेवाळे, गणेश राजपूत आदी उपस्थित होते. डॉ. श्रमिक गोजमगुंडे यांनी सांगितले की, मंत्री निलेश राणे यांच्याकडे संस्थेच्या वतीने मागणी केली आहे की, जंजीरा किल्ल्यावर ज्या प्रमाणे जाण्यायेण्यासाठी जेट्टी बांधली आहे तशी जेट्टी पद्मदुर्ग किल्ल्यावर सरकारने बांधावी. यामुळे येथे दळणवळण वाढेल आणि पर्यटनालाही चालना मिळेल. कुणाल साठे यांनी सांगितले की, २०१६ मध्ये संस्थेच्या वतीने ३०० किल्ल्यांवर एकाच वेळी भगवा झेंडा फडकवला, परंतु जंजीरा किल्ल्यावर तेथील अल्पसंख्यांक समाजाने विरोध केला. त्यानंतर आमच्या संस्थेच्या वतीने पत्रव्यवहार करण्यात येत आहे.

पुढील तीन महिन्यात जंजीरा किल्ल्यावर सरकारने सन्मानाने भगवा झेंडा लावावा अन्यथा संस्थेच्या वतीने हजारो दुर्गप्रेमी एकत्र येऊन तेथे भगवा झेंडा फडकवतील. यासाठी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थान संस्थेचे अध्यक्ष आमदार संजय केळकर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये जनजागृती करण्यात येत आहे अशी माहिती कुणाल साठे यांनी दिली.

## मोफत आरोग्य तपासणी शिबिरास रवि लांडगे यांची उपस्थिती

पिंपरी (दै. संध्या)

बँक ऑफ बडोदाच्या ११९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या मोफत आरोग्य तपासणी शिबिरास पिंपरी-चिंचवड शहराचे महापौर रवि लांडगे यांनी उपस्थित राहून या समाजोपयोगी उपक्रमाचे कौतुक केले. नागरिकांच्या आरोग्य संवर्धनासाठी विविध सामाजिक संस्था, बँका आणि स्वयंसेवी संघटनांनी पुढाकार घेत अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. यावेळी महापौर रवि लांडगे यांनी शिबिराची पाहणी करून उपस्थित नागरिकांशी संवाद साधला तसेच वैद्यकीय पथकाकडून करण्यात येणाऱ्या विविध आरोग्य तपासण्यांची माहिती



घेतली. या शिबिराच्या माध्यमातून नागरिकांना मोफत आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देत आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याचा महत्त्वपूर्ण प्रयत्न करण्यात आला. याप्रसंगी बोलताना महापौर रवि लांडगे म्हणाले की, बदलती जीवनशैली, वाढता ताण आणि विविध आजारांचे वाढते प्रमाण लक्षात घेता नियमित आरोग्य तपासणी करणे अत्यंत आवश्यक आहे. वेळेत तपासणी झाल्यास अनेक गंभीर आजारांचे प्रारंभीच निदान होऊन त्यावर प्रभावी उपचार करणे शक्य होते. त्यामुळे नागरिकांनी अशा आरोग्य शिबिरांचा लाभ घेऊन स्वतःच्या आरोग्याबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे. प्रतिबंधात्मक आरोग्यसेवेचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचविणे, नागरिकांना वेळेवर वैद्यकीय सल्ला मिळवून देणे आणि आरोग्यदायी समाज निर्माण करण्यासाठी अशा उपक्रमांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. सामाजिक बांधिलकी जपत बँक ऑफ बडोदाने आपल्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून राबविलेला हा उपक्रम निश्चितच अनुकरणीय असल्याचेही त्यांनी सांगितले. समाजाप्रती असलेली सामाजिक जबाबदारी जपत हा उपक्रम यशस्वीपणे राबविल्याबद्दल बँक ऑफ बडोदा, पिंपरी-चिंचवड शाखेचे मुख्य व्यवस्थापक डॉ. अभिषेक परमार, अमोल धावरे, अश्विनी राठोड, संपदा देशपांडे, आरती गायकवाड तसेच या उपक्रमासाठी परिश्रम घेतलेल्या सर्व अधिकारी, कर्मचारी आणि वैद्यकीय पथकाचे महापौर रवी लांडगे यांनी मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## आकुर्डी-दत्तवाडी परिसरात 'बीएलओं'कडून नागरिकांची पिळवणूक

पिंपरी (दै. संध्या)

■ राष्ट्रवादीचे नगरसेवक प्रमोद कुटे यांची कारवाईची मागणी

पिंपरी विधानसभा मतदारसंघातील आकुर्डी, दत्तवाडी या भागातील मतदार यादी क्रमांक ४३ ते ७२ मधील नागरिकांची बीएलओंकडून पिळवणूक, छळवणूक होत आहे. एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात बोलविले जाते. काही बीएलओंनी परस्पर खासगी लोकांची या कामासाठी नियुक्ती केली आहे. यातून नागरिकांच्या माहितीचा गैरवापर होऊ शकतो. अशा बीएलओंवर तातडीने कारवाई करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरसेवक प्रमोद कुटे यांनी केली आहे. नगरसेवक कुटे म्हणाले, निवडणूक आयोगाच्या नियमानुसार बीएलओंनी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन पडताळणी करणे अपेक्षित आहे. मात्र, पिंपरीतील अनेक भागांत बीएलओंकडून मतदारांना नगरसेवकांच्या कार्यालयात, पक्षांच्या संपर्क कार्यालयात, सार्वजनिक बागेत किंवा शाळांमध्ये बोलावून अर्ज भरून घेतले जात आहेत. नागरिकांना एका कार्यालयातून दुसऱ्या कार्यालयात बोलविले जाते. 'बीएलओंनी केंद्रावर जाणे किंवा संबंधित मतदारांच्या घरी जाऊन फॉर्म भरुन घेणे अपेक्षित आहे. त्याऐवजी बीएलओंकडून नागरिकांची पिळवणूक केली जात आहे.

## भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन



पिंपरी (दै. संध्या)

महाराष्ट्राचे लाडके मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त, भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहराच्या वतीने आणि शहराध्यक्ष तथा नगरसेवक शत्रुघ्न (बापू) काटे यांच्या नेतृत्वाखाली बुधवार, दि. २२ जुलै २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत शहरात भव्य महारक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमांतर्गत पिंपरी, चिंचवड आणि भोसरी या तिन्ही विधानसभा मतदारसंघांमध्ये विविध ठिकाणी रक्तदानाची सोय करण्यात आली आहे. चिंचवड विधानसभा मतदारसंघांतर्गत काळेवाडीतील पार्वती इंग्लिश मीडियम स्कूल (संपर्क: ९९२३५०८९८६), थेरगावमधील गुजर नगर येथील प्रेरणा शाळा (संपर्क: ९६३७८३१२१२ व ७७२२०२४४४४), पिंपळे सौदागर येथील बासरी बँक्वेट हॉल, पिंपळे गुरवमधील रामकृष्ण मंगल कार्यालय आणि ढोरे नगरची मनपा अहिल्यादेवी होळकर शाळा (संपर्क: ७७४४०१३१२३), वाल्हेकरवाडीतील दत्त मंदिर (संपर्क: ९८२२४०७०७१), प्राधिकरण सेक्टर २६ (संपर्क: ९०४९७२२२८०), तसेच चिंचवड येथील नोवेल इंटरनॅशनल स्कूल, आकुर्डी गाव (संपर्क: ८६००३२८९४६) या केंद्रांवर शिबिर पार पडेल.

# मोशीतील वायू प्रदूषणाविरोधात प्रा. कविता आल्हाट यांचा आक्रमक पवित्रा

**नागरिकांच्या तक्रारीची आयुक्तांकडून दखल; अनधिकृत भंगार साठ्यांवर कारवाईचे आदेश**

पिंपरी (दै. संध्या)

मोशी परिसरातील विष्णू ग्रीन्स सहकारी गृहरचना संस्थेजवळ वारंवार प्लास्टिक, टायर व इतर भंगाराला आग लावून निर्माण होणाऱ्या तीव्र वायू प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या पिंपरी-चिंचवड शहर महिला अध्यक्षा प्रा. कविता संदेश आल्हाट यांनी नागरिकांच्या बाजूने ठाम भूमिका घेत महापालिका प्रशासनाकडे आक्रमक पाठपुरावा केला. विष्णू ग्रीन्स सहकारी गृहरचना संस्थेतील महिलांनी प्रा. कविता संदेश आल्हाट यांची भेट घेऊन परिसरातील प्रदूषणाबाबत निवेदन सादर केले. त्यानंतर त्यांनी तातडीने पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची प्रत्यक्ष भेट घेत नागरिकांच्या




आरोग्याशी संबंधित या गंभीर प्रश्नाकडे त्यांचे लक्ष वेधले. तसेच महापौर रवी लांडगे यांचीही भेट घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई, अनधिकृत भंगार साठे हटविणे आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणी केली. या वेळी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे उपस्थित होते. प्रा. कविता संदेश आल्हाट यांनी केलेल्या पाठपुराव्याची दखल घेत आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना तात्काळ संयुक्त पाहणी करण्याचे, अनधिकृत भंगार साठे हटविण्याचे, दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे तसेच भविष्यात अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना राबविण्याचे स्पष्ट निर्देश दिले. याबाबत प्रतिक्रिया देताना प्रा. कविता संदेश आल्हाट म्हणाल्या, "नागरिकांच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कोणतीही माफी दिली जाणार नाही. मोशी परिसरातील प्रत्येक नागरिकाला स्वच्छ आणि प्रदूषणमुक्त वातावरण मिळावे, यासाठी माझा संघर्ष यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू राहील. प्रशासनाने दिलेल्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी होईपर्यंत मी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा करणार आहे."

## थोडक्यात पण महत्वाचे...



### संजय काळेंच्या कार्याला सुभाष कवडेंची दाद

नारायणगाव (दैनिक संध्या) : जुन्नर तालुक्यातील शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील ॲड. संजय शिवाजीराव काळे यांचे कार्य अत्यंत दिशादर्शक आणि प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी विभागीय अधिकारी सुभाश कवडे यांनी केले. ते नुकतेच आपटाळे येथे आयोजित भव्य वृक्षारोपण कार्यक्रमात बोलत होते.ॲड. संजय काळे यांच्या वाढदिवसानिमित्त आपटाळे येथे एका भव्य वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी उपस्थित जनसमुदायाला संबोधित करताना कवडे यांनी ॲड.संजय काळे यांच्या कार्याचा गौरव केला. तालुक्याच्या विकासात आणि सामाजिक जडणघडणीत त्यांचे योगदान मोलाचे असल्याचे त्यांनी नमूद केले.या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांनी उपस्थितीत होते. यामध्ये जिल्हा बँकेचे तालुका विभागीय अधिकारी बाळासाहेब मुरादे, बबन केंगले, विकास अधिकारी वसंत ताजणे, महेंद्र पवार, दत्ता भवारी, किसन आंबवणे,दगडू डामसे, संदीप कोल्हाळ अर्जुन उंडे,दिनकर मुंढे ,महेश घोगरे, संतोष खिलारी, माऊली हिले, नावजी ढगळे, अण्णासाहेब गोसावी, लक्ष्मण बगाड, रामदास चतुर, अनघा भालेकर, कमल भालिंगे, भगवंत बांडे, जयराम खिलारी, विष्णू उतर्डे, संदीप जाधव, रोहिदास उतर्डे, चिमा गांगड यांसह इतर पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. वाढदिवसाचे औचित्य साधून करण्यात आलेल्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.



### मोनिका पतसंस्थेची 10 वी वार्षिक सर्वसाधारण सभा उत्साहात संपन्न

नारायणगाव (दैनिक संध्या) : मोनिका पतसंस्थेची १० वी वार्षिक सर्वसाधारण सभा ओतूर येथे उत्साहात पार पडली.सहकार क्षेत्रात मानाचा 'अ' ऑडिट वर्ग मिळवून संस्थेने चालू आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. संस्थेची एकूण सभासद संख्या १९०५ इतकी झाली आहे.संस्थेच्या अध्यक्षा नीलिमाताई तांबे यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा संपन्न झाली. या प्रसंगी बोलताना त्यांनी सर्व सभासदांना लाभांश आणि दिवाळी भेट दिली जाणार असल्याचे जाहीर केले. तसेच, पारदर्शक कामकाजासाठी संस्थेचे सर्व व्यवहार ॲड सॉफ्टवेअर प्रा. लि. पुणे' यांच्या कोअर बँकिंग सोल्यूशन आणि एसएमएस प्रणालीद्वारे पूर्णपणे संगणकीकृत करण्यात आले आहेत. अध्यक्षांनी सर्व सभासदांना आपले केवायसी अद्ययावत करण्याचे आवाहनही केले.या कार्यक्रमाला संस्थेच्या सचिव मोनिका शहा, उपाध्यक्ष ललिता शेटे, आणि संचालिका सुरेखा फापाळे, विमल पानसरे, वैशाली बोचरे, वृषाली डुंबरे,अश्विनी ढमाले,वैशाली ठिकेकर, संगीता काळे, रोहिणी बावबंदे,मंगल खेत्री, रेश्मा भले, अलका तांबे, रंजना डुंबरे आदी उपस्थित होत्या.




### रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी किशोर भोसले तर सचिव पदी डॉ. भरत राऊत

चाकण (दैनिक संध्या) : चाकण रोटरी क्लबच्या अध्यक्षपदी येथील उद्योजक किशोर भोसले यांची, तर डॉ.भरत राऊत यांची सचिव पदी नियुक्ती करण्यात आली. चाकण रोटरी क्लबच्या वतीने येथे आयोजित करण्यात आलेल्या रोटरी क्लबच्या पदग्रहण समारंभात किशोर भोसले यांची अध्यक्षपदी, डॉ. भरत राऊत यांची सचिव पदी तर डॉ. विजय भवारी यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. रोटरी ३१३१ चे जिल्हा प्रांतपाल नितीन धमाले यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांना आपापले अधिकार प्रदान करण्यात आले. यावेळी खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते पाटील, नगराध्यक्षा मनिषा गोरे, सहाय्यक प्रांतपाल शिवाजी टाकळकर, डॉ. नीलम धमाले, डॉ. विद्या भोसले, नगरसेवक साहेबराव कड, सुभाष वाडेकर, प्रकाश वाडेकर आदींच्या प्रमुख उपस्थितीत पदग्रहण समारंभ मोठ्या दिमाखात संपन्न झाला. रोटरीचे नवनिर्वाचित अध्यक्ष किशोर भोसले व सचिव डॉ. भरत राऊत यांनी यावेळी सांगितले की," चाकण रोटरी क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांना बरोबर घेऊन नवनवीन उपक्रम राबविणार आहे. त्यामध्ये प्रामुख्याने रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, नेत्र शिबिर, सुलभ शौचालय, वृक्षारोपण, शालेय साहित्यांचे वाटप, अनाथांना मदत, व्याख्यानमाला आदी उपक्रमांवर विशेष भर देणार आहे."

### सटवाजीबाबा देवस्थानास ब दर्जासाठी प्रयत्न करणार : संतोष नाना डोळस



राजगुरुनगर (दैनिक संध्या) : अखंड महाराष्ट्राचे श्रद्धास्थान असलेले खेड तालुक्यातील गुळाणी येथील श्री क्षेत्र सटवाजीबाबा देवस्थान ब दर्जात रूपांतर होणेसाठी पाठपुरवठा करणार असल्याचे मत रिपाइं(आठवले)श्रमिक ब्रिगेडचे पुणे जिल्हाध्यक्ष संतोषनाना डोळस यांनी सांगीतले. गुळाणी येथील श्री क्षेत्र सटवाजीबाबा देवस्थान येथे दिवसेंदिवस भाविकांच्या संख्येत लक्षणीय वाढ होत असल्यामुळे येथील सुखसुविधांसाठी शासनस्तरावरून अधिकचा अर्थिक निधी प्राप्त करणे भविष्यात अत्यंत गरजेचे आहे त्यासाठी देवस्थान क दर्जात प्राप्त असून त्याचे ब दर्जात रूपांतर होणेसाठी पाठपुरवठा करणार असल्याचे मत रिपाइं(आठवले)श्रमिक ब्रिगेडचे पुणे जिल्हाध्यक्ष संतोषनाना डोळस यांनी देवस्थान भेटी दरम्यान व्यक्त केले. राज्यातील तीर्थक्षेत्रांचा विकास करण्यासाठी शासनाकडून अ,ब,क दर्जा देण्यात येतो हे देवस्थान शासनाच्या क दर्जात समाविष्ट आहे भाविकांची वाढती वरदळ लक्षात घेऊन त्यासाठी रस्ते, पाणी,स्वच्छतागृहे,भक्तनिवास या सारख्या पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी देवस्थानाचे ब दर्जात रूपांतर करण्यासाठी ट्रस्टी बरोबर प्रयत्न करण्यास मी कटिबद्ध आहे असेही डोळस यांनी यावेळेस जाहीर केले यावेळी देवस्थान ट्रस्टच्या वतीने श्रीफळ देऊन संतोषनाना डोळस यांचा सपत्नीक सत्कार करताना गुळाणी गावचे माजी सरपंच तथा देवस्थानचे अध्यक्ष दिलीपराव ढेरंगे खजिनदार राम महाराज रोडे विश्वस्त बबन महाराज कोरडे सुभाष पिंगळे भिकाजी ढेरंगे यशवंत पिंगळे रेटवडी गावचे पोलीस पाटील उत्तमराव खंडागळे यांसह ग्रामस्थ उपस्थित होते.

# डास प्रतिबंधक औषध फवारणी

चाकण (दै. संध्या)



अतिवृष्टी अन् मुसळधार पावसामुळे चाकण नगरपरिषद हद्दीतील एकतानगर व साई कॉलनी परिसरात डेंग्यू, मलेरियाचे रुग्ण वाढले होते. त्या पार्श्वभूमीवर वाढत्या रुग्णांची चिंता लक्षात घेता महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे यांच्या पुढाकारातून डास प्रतिबंधक औषध फवारणी मोहीम हाती घेण्यात आली.

गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे चाकण नगरपरिषद हद्दीतील अनेक सखल भागांत मोठ्या प्रमाणावर पाणी साचले आहे. प्रभाग क्रमांक दोन मधील एकतानगर परिसर आणि साई कॉलनी भागात पाणी साचल्यामुळे डासांची उत्पत्ती वाढून डेंग्यू व मलेरियांसारख्या घातक साथीच्या आजारांचे रुग्ण आढळून आले आहेत. चाकण परिसरात लागण झालेले रुग्ण आढळल्याने रहिवाशांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर स्थानिक नागरिकांनी नगरसेविका रुपाली राहुल कांडगे यांच्याशी संपर्क साधून येथील विदारक परिस्थितीची माहिती दिली. नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होताच कांडगे यांनी तत्परता दाखवली. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून त्यांनी क्षणाचाही विलंब न लावता तातडीने फवारणी करणाऱ्या ठेकेदारांशी संपर्क साधला. एकतानगर आणि साई कॉलनी या दोन्ही संवेदनशील भागांत युद्धपातळीवर डास प्रतिबंधक औषध फवारणी आणि धूर फवारणी (फॉगिंग) करण्याचे कडक निर्देश दिले. ठेकेदाराने तात्काळ संबंधित यंत्रणेला आदेश देऊन आवश्यक भागात औषध फवारणीचे काम सुरू केले आहे.

लोकप्रतिनिधींनी दाखवलेल्या या गतिमान कामामुळे स्थानिक रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.

> “नागरिकांचे आरोग्य ही पहिली प्राथमिकता आहे. नगरपरिषदेच्या माध्यमातून औषध फवारणी सुरू करण्यात आली असली, तरी नागरिकांनीही आपल्या घराच्या परिसरात, गॅलरीत किंवा छतावर दुर्गंधीयुक्त पाणी साचू न देता दक्षता बाळगावी. स्वच्छता राखून आरोग्याची काळजी घेण्याची गरज आहे.”
> **- रूपाली कांडगे, नगरसेविका, चाकण.**

## हेमलता देशमुख यांचा सन्मान



चाकण (दै. संध्या)

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चाकण नं.एकच्या मुख्याध्यापिका हेमलता बाळासाहेब देशमुख यांचा सेवापूर्तीचा कार्यक्रम श्रेया लॉन्स याठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी चाकण नगर परिषदेच्या नगराध्यक्षा मनीषाताई गोरे यांनी मुख्याध्यापिका हेमलता देशमुख यांनी केलेल्या ज्ञानदाना बद्दल त्यांचे कौतुक केले. देशमुख यांनी आपल्या सेवेच्या काळामध्ये शिक्षण सेवा करत सेवापुर्ती निमित्त शाळेतील मुलांसाठी बालोद्यान दीड ते दोन लाखांची खेळणी देऊन खऱ्या अर्थाने एक उत्तम सेवा केली. शाळेतील मुलांना पाण्याच्या सोयीसाठी बोअर मध्ये पाण्याची मोटर बसवून मुलांच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावला. यावेळी महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीनभाऊ गोरे, चाकणचे नगरसेवक साहेबराव कड, मंगेश कांडगे, आकाश जाधव, केंद्रप्रमुख सुनील रायकर, निवृत्त पोलीस अधिकारी गाडे, बीडीओ सुर्वे, देशमुख यांचे नातेवाईक तसेच शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्ताराधिकारी आदींसह विविध क्षेत्रातील प्रतिष्ठित मान्यवर, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजन बाळासाहेब देशमुख यांनी केले.

प्रास्ताविक मनीषा कुंभार यांनी तर नीलिमा मांडेकर यांनी स्वागत केले. सूत्रसंचालन तुषार वाटेकर व नारायण करपे यांनी केले. आभार प्रभाकर शिंदे यांनी मानले.

## केंद्रीय शिक्षण मंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी

### पुरंदरमध्ये शिवसेनेचे तहसीलदारांना निवेदन




सासवड (दै. संध्या)

नीट, टीईटी आणि इतर परीक्षांमधील पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्येला कारणीभूत ठरणाऱ्या केंद्रीय शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) यांच्या वतीने पुरंदर तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी बोलताना शिवसेनेचे अभिजीत मधुकर जगताप म्हणाले की, "देशातील तरुणाईचे भवितव्य घडवणाऱ्या परीक्षांमध्ये होत असलेला भ्रष्टाचार अत्यंत गंभीर आहे.

या पेपरफुटीमुळे अनेक विद्यार्थ्यांनी हताश होऊन आत्महत्या केल्या आहेत. मात्र, या घटनांची नैतिक जबाबदारी स्वीकारून शिक्षण मंत्र्यांनी राजीनामा देण्याऐवजी ते पदाला चिकटून आहेत. सोनम वांगचुक यांच्यासारखे ख्यातनाम व्यक्ती याविरोधात उपोषण करत असतानाही सरकार गप्प बसून आहे, हे संतापजनक आहे."

## चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी जयश्री नायकवाडी

चाकण (दै. संध्या)

चाकण नगरपरिषदेच्या उपनगराध्यक्षपदी शिवसेना शिंदे गटाच्या जयश्री विशाल नायकवाडी यांची निवड झाली. तसेच स्वीकृत नगरसेवकपदी तिघांना संधी मिळाली.

चाकण नगरपरिषदेच्या मावळत्या उपनगराध्यक्षा सुवर्णा शामराव राक्षे यांनी आपल्या पदाचा नियोजित कालावधी पूर्ण झाल्याने इतरांना या पदावर काम करण्याची संधी मिळावी म्हणून स्वखुशीने राजीनामा दिला होता. त्यामुळे हे पद रिक्त झाले होते. या पदासाठी चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा तथा पीठासीन अधिकारी मनीषा गोरे यांच्या अध्यक्षतेखली श्री शिव छत्रपती सभागृहात ही निवडणूक प्रक्रिया राबविण्यात आली. उपनगराध्यक्ष पदासाठी जयश्री नायकवाडी व विजया तोडकर यांचे अर्ज दाखल झाले.यामध्ये झालेल्या निवडणूकीत नायकवाडी यांना १६ मते तर तोडकर यांना १० मते मिळाली. सर्वाधिक मते जयश्री नायकवाडी यांना मिळाल्याने त्यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाल्याचे नगराध्यक्ष मनीषा गोरे आणि मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव यांनी घोषित केले.स्वीकृत नगरसेवकपदी शिवसेनेकडून गुलाब शेवकरी व समीर सिकीलकर तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून करण सोनवणे यांना संधी देण्यात आली.

### तिघांना स्वीकृत नगरसेवकपदाची संधी



चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनिषा गोरे यांच्या नेतृत्वाखाली पार पडलेल्या या निवडणूक प्रक्रियेच्या वेळी गटनेते नितीन गोरे, सुवर्णा राक्षे, मंगेश कांडगे, अनिल लोहकरे, ॲड. प्रकाश गोरे, हर्षद लेंडघर स्वाती लेंडघर, साधना गोरे, आरती परदेशी, रूपाली कांडगे, रणजीत जरे, अनिता घोगरे, प्रेम जगताप,गटनेते साहेबराव कड,प्रकाश भुजबळ,आकाश जाधव,धीरज मुटके,सागर बनकर,रेश्मा मुटके,विजया तोडकर,वर्षा शेवकरी,तृप्ती जगनाडे,विजया जाधव आदी उपस्थित होते.

> “चाकण शहराच्या विकासासाठी स्व.आ. सुरेशभाऊ गोरे यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रलंबित कामांना गती देणार आहे. गावचा विकास हाच आमचा ध्यास राहील.”
> **- जयश्री नायकवाडी, उपनगराध्यक्षा, चाकण**

उपनगराध्यक्षपदी कोणाला संधी मिळणार, याकडे चाकणकरांचे लक्ष लागले होते. जयश्री नायकवाडी यांची उपनगराध्यक्षपदी निवड झाल्याने चाकण नगरपरिषदेवर शिवसेना शिंदे गटाचे वर्चस्व असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. नायकवाडी यांची उपनगराध्यक्षपदी निवड जाहीर होताच शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी फटाक्यांची प्रचंड आतषबाजी केली. मुख्याधिकारी डॉ. अंकुश जाधव, नगराध्यक्षा मनिषा गोरे व गटनेते नितीन गोरे यांच्या हस्ते जयश्री नायकवाडी यांचा सन्मान करण्यात आला.

## प्रेयसीला आत्महत्येस प्रवृत्त करणारा धोकेबाज प्रियकर फरार

चाकण (दै. संध्या)

प्रेयसीला आत्महत्येस प्रवृत्त करणारा धोकेबाज प्रियकर गेल्या आठ दिवसांपासून फरार झाला आहे. लग्नास नकार दिल्याने आलेल्या नैराश्यातून प्रेयसीने राहत्या घरी ओढणीच्या सहाय्याने छताच्या अँगलला गळफास घेऊन आत्महत्या केली होती. तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी तिच्या प्रियकरावर गुन्हा दाखल होताच तो कोणाला कसलाच थांगपत्ता लागू न देता पोलिसांना गुंगारा देऊन फरार झाला आहे. खेड तालुक्यातील खालुंब्रे येथील तुळवे वस्तीतील एका भाड्याच्या खोलीत बुधवारी (दि.१५) सायंकाळी पाच वाजण्याच्या दरम्यान हा प्रकार घडला होता. मोनिका रामदास पवार (वय - २२, रा. चंद्रकांत तुळवे यांची खोली, तुळवे वस्ती,



खालुंब्रे, ता. खेड, मूळ रा. खांडके, ता.जि. अहिल्यानगर,) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव आहे. तिची आई रोहिणी रामदास पवार (वय - ४०, रा. खालुंब्रे) यांनी याप्रकरणी उत्तर महाळुंगे इंगळे एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. रोहिणी यांनी महाळुंगे पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून, महाळुंगे पोलिसांनी साहिल शंकर बोत्रे (वय - २३, रा.येलवाडी, ता. खेड) याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

अधिक माहिती अशी की, मोनिका ही तिच्या आई-वडिलांसमवेत खालुंब्रे येथे तुळवे यांच्या भाड्याच्या खोलीत गेल्या वीस वर्षांपासून राहत होती. दरम्यानच्या काळात मोनिका व साहिल यांच्यामध्ये सुत जुळून प्रेमसंबंध निर्माण झाले. साहिल याने मोनिका हिला लग्नाचे आमिष दाखवून लग्न न करता तो दुसऱ्या एका मुलीबरोबर चॅटिंग करीत असल्याचे तिला समजले.

मोनिका हिने याबाबत साहिल याला विचारणा केली असता त्याने सांगितले की ती माझी मैत्रीण आहे. म्हणून मी तिच्याशी चॅटिंग करत आहे. मी तुझ्याशी लग्न करणार नाही, आपल्या दोघांच्या लग्नाला माझ्या घरच्यांचा तीव्र विरोध आहे. यातून आलेल्या नैराश्यातून मोनिका हिने कोणाला कसलाच थांगपत्ता लागू न देता राहत्या घरी ओढणीच्या सहाय्याने छताच्या अँगलला गळफास लावून घेऊन आत्महत्या केली.

मोनिका पवार हिला आत्महत्येस प्रवृत्त करणारा तिचा धोकेबाज प्रियकर साहिल बोत्रे याच्यावर गुन्हा दाखल होताच तो फरार झाला आहे.

> “माझ्या पोटच्या मुलीचा जीव गेला आहे. साहिल बोत्रे याने माझ्या मुलीला फसवले असून त्याला पोलिसांनी तातडीने अटक करून मला न्याय द्यावा. बोत्रे याची अटक टाळण्यासाठी राजकीय हस्तक्षेप सहन करणार नाही.”
> **- रोहिणी पवार, (मयत मोनिकाची आई, खालुंब्रे)**

## मोबिलिटी स्मार्ट सोल्यूशन्स कंपनीत कर्मचाऱ्याकडून बनावट चलन

### ई-मेलच्या आधारे अडीच कोटींचा अपहार

बालेवाडी (दै. संध्या)

बनावट चलनांचा आणि ई-मेलचा वापर करून कंपनीच्या सुमारे अडीच कोटी रुपयांचा अपहार केल्याचा प्रकार समोर आला आहे.

ही घटना बालेवाडी येथील मोबिलिटी स्मार्ट सोल्यूशन्स या कंपनीत घडली. याबाबत योगेश सुरेश दीपांकर (वय ४४, रा. रावेत) यांनी बाणेर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यावरून कौस्तुभ शिवकुमार विभूते (वय ३४, रा. मुंढवा) या संशयिताविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जून २०२४ ते फेब्रुवारी जुलै २०२६ दरम्यान, आरोपी कौस्तुभने कंपनीचा विश्वासघात करून बनावट रीइम्बर्समेंट अर्ज, खोटे व्हाउचर आणि बनावट ई-मेल आयडी तयार केले. त्याने कर्मचाऱ्यांच्या खर्चाचे परतफेड अर्ज, मूळ पुरवठादारांचे बँक तपशील बदलून स्वतःचे खाते क्रमांक टाकले.




कंपनीच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना संशय येऊ नये म्हणून हुबेहूब बनावट ई-मेल पाठवले. या आधारे कंपनीचा सुमारे दोन कोटी ४५ लाख रुपयांचा निधी स्वतःच्या खात्यात वळवला. या गुन्ह्याचा तपास पोलिस निरीक्षक (गुन्हे) विजय खिल्लारे करत आहेत.

# ४० दिवसीय मोफत महिला शिवणकला प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ

जुन्नर (दै. संध्या)




ग्रामीण भागातील महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वावलंबी बनविण्यासाठी तसेच स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बल्लाळवाडी येथे ४० दिवसीय मोफत महिला शिवणकला प्रशिक्षण वर्गाचा शुभारंभ आमदार शरददादा सोनवणे यांच्या शुभहस्ते उत्साहात संपन्न झाला.

हा प्रशिक्षण उपक्रम डिसेंट फाउंडेशन, पुणे व हायस्पीड स्किल हब, जुन्नर यांच्या संयुक्त विद्यमाने बल्लाळेश्वर ज्येष्ठ नागरिक संघ, विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटी, ग्रामविकास मंडळ, ग्रामपंचायत बल्लाळवाडी, बल्लाळेश्वर प्रतिष्ठान (मुंबई) तसेच गावातील सर्व महिला बचत गट यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला आहे.

या ४० दिवसीय प्रशिक्षणामध्ये महिलांना आधुनिक शिवणकलेचे व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. यामध्ये विविध प्रकारचे ब्लाऊज, मुलींचे ड्रेस, परकर, लहान मुलांचे फ्रॉक, फॅन्सी झगे तयार करण्याबरोबरच शिलाई मशीनची किरकोळ दुरुस्ती व देखभाल यांचेही तांत्रिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या सर्व महिलांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र तसेच उद्यम आधार कार्ड प्रदान करण्यात येणार आहे.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार शरददादा सोनवणे म्हणाले, “ग्रामीण भागातील शेती व मजुरी करणाऱ्या महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणारा हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून अशा प्रशिक्षणातून महिलांच्या सक्षमीकरणाला निश्चितच चालना मिळेल.”

कार्यक्रमास आमदार शरददादा सोनवणे, डिसेंट फाउंडेशनचे संस्थापक जितेंद्र बिडवई, हायस्पीड स्किल हबचे प्रमुख दिलीप भगत, प्रशिक्षिका सौ. छाया पाटील, सौ. उज्वला गवळी, जुन्नर तालुका ज्येष्ठ नागरिक समन्वय समितीचे अध्यक्ष प्रा. एकनाथ डोंगरे, सरपंच संजय नायकोडी, विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन सुधीर डोंगरे, दिनकर गावडे, सावळेराम डोंगरे, उदय गावडे, जबाजी डोंगरे, गोविंद डोंगरे, नवनाथ डोंगरे, हर्षल आहेर, पोलीस पाटील सुरेश डोंगरे, आनंद गावडे, दामाजी डोंगरे, महादू शिंदे, कुशभाऊ डोंगरे ,महिला बचत गटांच्या पदाधिकारी, ग्रामस्थ तसेच मोठ्या संख्येने महिला उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मंगल डोंगरे यांनी केले, तर नामदेव डोंगरे यांनी






दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# खेळाडूंना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या उपस्थितीत कोल्हापूर आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमसाठी सामंजस्य करार



■ मुंबई (दै. संध्या)

कोल्हापूर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट स्टेडियम उभारण्यासाठी मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा क्रीडा व युवक कल्याण मंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या उपस्थितीत जिल्हा क्रिकेट असोसिएशन, कोल्हापूर आणि क्रीडा विभाग यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या सामंजस्य करारामुळे भविष्यातील खेळाडूंना जागतिक दर्जाच्या सुविधा उपलब्ध होणार आहेत.

यावेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, सार्वजनिक आरोग्य मंत्री तथा कोल्हापूरचे पालकमंत्री प्रकाश आबिटकर, राज्य नियोजन मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष राजेश क्षीरसागर, आमदार अमल महाडिक, कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष छत्रपती संभाजीराजे, क्रीडा विभागाचे प्रधान सचिव रणजीत सिंह देओल, कोल्हापूरचे जिल्हाधिकारी डॉ. विजय राठोड, क्रीडा विभागाचे उप सचिव आबासाहेब कवळे, क्रीडा व युवक सेवा सहसंचालक सुधीर मोरे तसेच जिल्हा क्रिकेट असोसीएशनचे कार्यकारिणी सदस्य रामचंद्र पाटणकर व पदाधिकारी ऋतुराज इंगळे, अभिजीत भोसले, मदन शेळके उपस्थित होते. जागतिक दर्जाच्या सुविधा ही संकल्पना केवळ क्रिकेटपुरती मर्यादित न राहता मल्टी स्पोर्ट्स हब म्हणून विकसित करण्यात येणार आहे. येथे बॉक्सिंग, ज्युडो, आर्चरी, कुस्ती, जलतरण, टेबल टेनिस, फेन्सिंग आदी खेळांसाठी अत्याधुनिक सुविधा निर्माण करण्यात येतील. तसेच क्रिकेट म्युझियम उभारण्यात येणार असून स्थानिकांना रोजगाराच्या नव्या संधीही उपलब्ध होणार आहेत.

करवीर तालुक्यातील मौजे विकासवाडी येथील १२.७६ हेक्टर (३१.९० एकर) शासकीय जागा कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशन (KDCA) यांना आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियम व संबंधित क्रीडा पायाभूत सुविधा उभारण्यासाठी सामंजस्य कराराअंतर्गत हस्तांतरित करण्यात आली. कोल्हापूर जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष छत्रपती संभाजीराजे व कोल्हापूर येथील क्रीडा व युवक सेवा उपसंचालक सुहास पाटील यांनी भाडेपट्टा करारनामा हस्तांतरणावर स्वाक्षरी केली. बीसीसीआय (BCCI) आणि आयसीसी (ICC)च्या निकषांनुसार सुमारे ३५ हजार प्रेक्षक क्षमतेचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्टेडियम उभारण्यात येणार आहे. या प्रकल्पात आधुनिक पॅव्हेलियन, सराव मैदाने, इनडोअर प्रशिक्षण केंद्र, स्पोर्ट्स सायन्स सेंटर, क्लब हाऊस, फ्लडलाइट व्यवस्था, क्रिकेट म्युझियम, खेळाडू व अधिकाऱ्यांसाठी तसेच सर्वसामान्यांसाठी वाहनतळ, अंतर्गत रस्ते, ड्रेनेज व्यवस्था, सौर ऊर्जा प्रकल्प तसेच अत्याधुनिक सुरक्षा व्यवस्थाही उभारण्यात येईल.

राज्यात जागतिक दर्जाच्या क्रीडा सुविधा उभारण्याच्या शासनाच्या संकल्पाला या प्रकल्पामुळे बळ मिळणार असून, कोल्हापूरच्या समृद्ध क्रीडा परंपरेला नवी दिशा मिळेल. या स्टेडियममुळे जिल्ह्यातील क्रिकेटला चालना मिळण्याबरोबरच ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंना आधुनिक प्रशिक्षण सुविधा उपलब्ध होतील. तसेच या प्रकल्पाच्या माध्यमातून क्रीडा पर्यटनाला प्रोत्साहन मिळून स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# गडचिरोली जिल्ह्यात टसर विशेष विकास प्रकल्प उभारणार

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत रेशीम संचालनालय आणि बाएफ यांच्यात सामंजस्य करार

■ मुंबई (दै. संध्या)

गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी शेतकरी कुटुंबांना शाश्वत रोजगार आणि उत्पन्नवाढीच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी रेशीम संचालनालय आणि बाएफ (बीएआयएफ) यांच्या संयुक्त विद्यमाने टसर विशेष विकास प्रकल्प राबविण्यात येणार आहे. मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि वस्त्रोद्योग मंत्री संजय सावकारे यांच्या उपस्थितीत या प्रकल्पाच्या सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. यावेळी वस्त्रोद्योग विभागाच्या प्रधान सचिव अन्शु सिन्हा, रेशीम संचालक विनय मून, उपसचिव डॉ. तुषार पवार, सहायक संचालक हेमंत लाडगावकर, बाएफचे अध्यक्ष डॉ. भारत काकडे, प्रादेशिक संचालक डॉ. रविराज जाधव, सुधीर वागळे, मुख्य कार्यक्रम अधिकारी शैलेश भगत तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.



### स्थानिक अर्थव्यवस्था अधिक बळकट होण्यास मदत

या टसर रेशीम विकास प्रकल्पामुळे गडचिरोली जिल्ह्यातील ग्रामीण व आदिवासी भागात रोजगारनिर्मितीला चालना मिळून स्थानिक अर्थव्यवस्था अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे. तसेच 'आत्मनिर्भर आदिवासी विकास' या संकल्पनेला गती मिळणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

महाराष्ट्रात तुती आणि टसर या दोन प्रकारच्या रेशमाचे उत्पादन घेतले जाते. पूर्व विदर्भातील गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा आणि गोंदिया या जिल्ह्यांमध्ये सुमारे ४४ हजार ५०० एकर क्षेत्रावर टसर मातृवृक्ष असून, जवळपास ३ हजार आदिवासी कुटुंबे पारंपरिक टसर रेशीम व्यवसायातून शाश्वत उपजीविका करत आहेत. गडचिरोली जिल्ह्यातील विस्तीर्ण जंगल, समृद्ध जैवविविधता आणि टसर कीटकांच्या खाद्यवृक्षांची उपलब्धता लक्षात घेता या भागात टसर रेशीम उद्योगाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर शाश्वत रोजगारनिर्मितीची क्षमता आहे. अनुसूचित जमाती, महिला बचत गट आणि स्थानिक शेतकऱ्यांचे कौशल्यवर्धन करून टसर रेशीम विकासात बाएफ संस्थेने यापूर्वीही उल्लेखनीय कार्य केले आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून गडचिरोली जिल्ह्यातील २ हजार २७० हून अधिक टसर शेतकरी कुटुंबांना शाश्वत उत्पन्नाच्या संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. तसेच अनुसूचित जमाती आणि महिलांचे आर्थिक व सामाजिक सक्षमीकरण करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. याअंतर्गत खाजगी टसर अंडीपुंज निर्मिती केंद्रे उभारणे, बीजकोष उत्पादन, व्यावसायिक कोष उत्पादन, कोषोत्तर मूल्यवर्धन साखळी विकसित करणे, प्रशिक्षण, तांत्रिक मार्गदर्शन आणि क्षमता विकास कार्यक्रम प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# छायाचित्र प्रदर्शनातून जीवनप्रवासाचे दर्शन



■ मुंबई (दै. संध्या)

उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्यावर आधारित छायाचित्र प्रदर्शनाच्या माध्यमातून दादांचा संपूर्ण जीवनप्रवास सुंदरपणे उलगडला गेला आहे. त्यांच्या कार्यकर्तृत्वाची आणि अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाची झलक यातून पाहायला मिळते. या छायाचित्र प्रदर्शनातून त्यांच्या संपूर्ण जीवनपटाचे दर्शन होत असून आपल्या सर्वांच्या मनात त्यांच्या स्मृती कायम राहतील अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या ६७ व्या जयंतीचे औचित्य साधून महिला आर्थिक विकास महामंडळाच्या सभागृहात त्यांच्या जीवनप्रवासावर आधारित 'अजित स्मृती अविट स्मृती' या विशेष छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते या प्रदर्शनाचे आज उद्घाटन झाले. प्रदर्शनाचे उद्घाटन केल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित दादांच्या आठवणींना उजाळा दिला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, जलसंपदा मंत्री गिरीश महाजन, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रदर्शनामुळे दादांच्या आठवणी पुन्हा एकदा ताज्या झाल्या आहेत. अजितदादांवर प्रेम करणाऱ्या आणि त्यांना मानणाऱ्या प्रत्येकाने हे छायाचित्र प्रदर्शन आवर्जून पाहावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले. आमदार शिवाजीराव गर्जे, सतीश चव्हाण, चंद्रदीप नरके, गोकुळ शिंदे, हिरामण खोसकर, माजी आमदार राजेश पाटील, गोकुळ संघाचे माजी चेअरमन अरुण डोंगरे यांच्यासह लोकप्रतिनिधी आणि मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# राज्यातील प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांबाबत धोरणात्मक निर्णय घेणार – मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील

■ मुंबई (दै. संध्या)

राज्यातील प्रकल्पग्रस्तांच्या विविध प्रलंबित मागण्यांबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे प्रस्ताव सादर करण्यात येणार असल्याची माहिती मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी दिली. मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयातील दालनात राज्यातील विविध प्रकल्पग्रस्त संघटनांच्या प्रतिनिधींसमवेत बैठक झाली. बैठकीत प्रकल्पग्रस्तांच्या रोजगार,




समांतर आरक्षण, पर्यायी जमीन वाटप, पुनर्वसन तसेच इतर प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीसाठी मदत व पुनर्वसन विभाग,जलसंपदा विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवून प्रकल्पग्रस्तांच्या विविध मागण्यांबाबत मंत्रिमंडळासमोर धोरणात्मक निर्णयासाठी प्रस्ताव ठेवण्यात येणार असल्याचे सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस यांना पाठविण्यात येणाऱ्या प्रस्तावामध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी सरकारी सेवेतील समांतर आरक्षणाची मर्यादा ५ टक्क्यांवरून १५ टक्क्यांपर्यंत वाढविणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत होणाऱ्या गट-अ, गट-ब तसेच गट-क पदभरतीमध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागू करणे, प्रत्येक जिल्ह्यात 'स्वर्गीय अजितदादा पवार प्रकल्पग्रस्त भवन' स्थापन करणे, तसेच प्रकल्पग्रस्तांसाठी राखीव जागांची तरतूद करण्याचा समावेश आहे. याशिवाय, पाझर तलाव, गाव तलाव व साठवण तलावांसारख्या जलसंधारण प्रकल्पांसाठी संपादित झालेल्या जमिनींच्या बाधितांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र देणे, बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील पदभरतीमध्ये प्रकल्पग्रस्तांसाठी समांतर आरक्षण लागू करणे, तसेच २०१३ पूर्वी थेट खरेदी पद्धतीने संपादित झालेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना पर्यायी जमीन उपलब्ध करून देण्यासाठी धोरणात्मक निर्णय घेण्याचाही प्रस्तावात समावेश करण्यात येणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर प्रकल्पग्रस्तांच्या रोजगार, पुनर्वसन आणि पर्यायी जमीन वाटपासह विविध मागण्यांबाबत शासन सकारात्मक असून, आवश्यक धोरणात्मक निर्णयासाठी मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर करण्यात येईल, असे मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव-पाटील यांनी सांगितले.

# राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयात उद्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम

## स्वर्गीय अजितदादा पवारांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने राज्यभरात दिनांक २२ ते २८ जुलै या कालावधीत 'जनसेवा सप्ताहा' चे आयोजन

■ मुंबई (दै. संध्या)

स्वर्गीय अजितदादा पवार यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेसच्यावतीने राज्यभरात दिनांक २२ ते २८ जुलै या कालावधीत 'जनसेवा सप्ताहा' चे आयोजन करण्यात आले असून राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश कार्यालयात उद्या जयंतीनिमित्त सकाळी १०.१० वाजता अजितदादांना अभिवादन करण्यात येणार आहे. आदरणीय अजितदादा म्हणजे अथक परिश्रम... दिलेला शब्द पाळणारे नेतृत्व... निर्णयक्षमता आणि जनतेसाठी अखंड झटणारे नेते... शेतकरी...कष्टकरी... महिला... युवक... विद्यार्थी यांना त्यांचा आधार होता... कृषी... सहकार... अर्थ... उद्योग... आरोग्य... शिक्षण... क्रीडा... पर्यावरण... पायाभूत सुविधा आणि सामाजिक विकास अशा प्रत्येक क्षेत्रात दादांनी आपल्या कार्याचा ठसा उमटवून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी अथक प्रयत्न केले आहे.

जनसेवा सप्ताहाच्या निमित्ताने खालील उपक्रम राबविले जाणार आहेत. त्यामध्ये पर्यावरण संवर्धन विषयक उपक्रम आदरणीय दादांनी नेहमीच वृक्ष व पर्यावरण संवर्धनावर भर दिला होता. त्यामुळे प्रत्येक गाव, तालुका, जिल्हा, आणि शाळा महाविद्यालये यामध्ये 'हरित महाराष्ट्र,वृक्ष माझी सावली, वृक्ष माझी माऊली,' 'दादांची दृष्टी, हरित सृष्टी,' अशा थीम अंतर्गत वृक्षारोपण मोहिम घेतली जाणार आहे. अजितदादांच्या स्मरणार्थ ज्येष्ठ अभिनेते सयाजी शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सह्याद्री देवराई फाऊंडेशन या संस्थेमार्फत महाराष्ट्रातील सर्व जिल्हयात 'देवगिरी ते देवराई' हा वृक्षसंवर्धन उपक्रम राबवला जाणार आहे. याअंतर्गत प्रत्येक लोकसभा, राज्यसभा, विधानसभा व विधानपरिषद आजी - माजी सदस्यांनी आपापल्या मतदारसंघात प्रत्येकी एक देवगिरी ते देवराई उभारावी.



आरोग्य विषयक उपक्रम : राज्यव्यापी रक्तदान शिबीरे आयोजित करुन रक्तदान जनजागृती व रक्तसाठा वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न. ग्रामीण व शहरी भागात मोफत आरोग्य तपासणी व रोगनिदान शिबिरे, त्यामध्ये मधुमेह, रक्तदाब आणि डोळ्यांच्या तपासणी केल्या जाणार आहेत. महिलांसाठी स्तन कर्करोग, गर्भाशय कर्करोग तपासणी आणि सर्वांसाठी मुख कर्करोग तपासणी व समुपदेशन करावे. महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी ऑस्टीओपोरोसिसचे निदान शिबीरे आयोजित करण्यात आले आहे.

अजितदादा शिस्तप्रिय व स्वच्छतेचे भोक्ते होतै. यामुळेच या जनसेवा सप्ताहात ठिकठिकाणी सार्वजनिक स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार आहे. यामध्ये गडकिल्ले, महापुरूषांची स्मारके, स्थळे, एसटी बसस्थानक आदी तर वारीसोबतच्या अजितदादांच्या स्मृती वारकऱ्यांच्याप्रती चिरंतन रहाव्यात यासाठी आषाढी वारीमध्ये वारकरी सेवा उपक्रम राबविला जाणार आहे.

दादांच्या सामाजिक समावेशकतेच्या विचारधारेला प्रोत्साहन देणारे महिलांसाठी राज्यस्तरीय मेळावे, यामध्ये महिला बचत गट सक्षमीकरण, आर्थिक सक्षमीकरण, शिक्षण आणि स्वयंरोजगार यावर चर्चा, संवाद व मार्गदर्शन कार्यक्रम, महिलांना सूक्ष्म कर्ज, कौशल्य प्रशिक्षण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये नेतृत्वासाठी मार्गदर्शन, पक्षाच्या महिला आघाडी मार्फत अजितदादा महिला सशक्तिकरण पुरस्कार दिला जाणार आहे. शिवाय शेतकरी महिला सन्मानही केला जाणार आहे. जगातील नवीन व सर्वोत्तम तंत्रज्ञानाबाबत दादा माहिती घेऊन त्याचे प्रयोग शेतीत करायचे यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजेच 'एआय' चा वापर करावा हा त्यांचा आग्रह होता. त्यामुळे एआय तंत्रज्ञानावर आधारित कार्यशाळा, कृषी प्रदर्शने, शेतकरी समुपदेशन मेळावे, पीक पध्दती आणि बाजारभाव मार्गदर्शन व फलोत्पादन आणि फुलशेतीबाबत कार्यक्रम, प्रगतशील व प्रयोगशील शेतकरी महिला व पुरुष यांना अजितदादा कृषी सन्मान पुरस्कार देण्यात यावा.

अजितदादांच्या सामाजिक विचारधारेवर पक्षाच्या युवा कार्यकर्त्यांना प्रेरणा देण्यासाठी आणि नेतृत्वासाठी तयार करण्यासाठी राज्यातील मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक या प्रमुख शहरांमध्ये युवा शिबिरे घेतली जाणार आहेत. शिवाय प्रमुख नेत्यांचा नेतृत्वाखाली कार्यशाळा, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसाठी युवांना प्रशिक्षण त्यामध्ये नेतृत्व कौशल्य, प्रचार रणनीती आणि मतदारांशी संवाद आदीचा समावेश असणार आहे. याशिवाय विविध क्रिडा प्रकारात नामांकित व उल्लेखनीय कामगिरी केलेल्या आजी-माजी खेळाडूंचा क्रीडा सन्मानाने गौरव व विविध खेळांचे आयोजन केले जाणार आहे.

अजितदादांनी अल्पसंख्याक समाजासाठी अनेक योजना आणि उपक्रम हाती घेतले होते अशा अनेक योजनांचा लाभ अल्पसंख्याक समाजाला मिळावा यासाठी सेवा संकल्प शिबिरे आयोजित केली जाणार आहे अशी माहिती प्रदेश कार्यालयातून देण्यात आली आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे




## मंडळांसाठी कार्यशाळेचे २३ जुलै रोजी आयोजन

मुंबई (दैनिक संध्या) : महाराष्ट्रात उत्साहाने साजऱ्या होणाऱ्या गणेशोत्सवाला महाराष्ट्र शासनाने मागील वर्षीपासून 'राज्य महोत्सवा'चा दर्जा दिला आहे. यावर्षी या राज्य महोत्सवांतर्गत होणाऱ्या उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव स्पर्धेचा विस्तार देशपातळीवर आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या विस्तारामुळे, राज्यासोबतच देशभरात व जगभरात विविध ठिकाणी जी सार्वजनिक मंडळे गणेशोत्सव अत्यंत उत्साहाने व विधायक उपक्रमांद्वारे साजरे करतात त्यांना देखील स्पर्धेत सहभागी होता येणार आहे. तसेच, त्यांच्या उपक्रमांची दखल शासनातर्फे घेतली जाणार असून, त्यांच्या उपक्रमांना भरघोस बक्षिसांच्या स्वरूपात प्रोत्साहन देखील लाभणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रणेते लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या जयंतीदिनी म्हणजेच येत्या २३ जुलै रोजी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ पदाधिकारी प्रशिक्षण कार्यशाळा रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी आणि पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी ह्यांच्या संयुक्त सहकार्याने आयोजित करण्यात आली आहे. कार्यशाळेचे उद्घाटन सांस्कृतिक कार्य विभागाचे मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या हस्ते होणार असून सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी, रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे कार्यकारी संचालक अभिराम घड्याळपाटील, सांस्कृतिक कार्य विभागाच्या उपसचिव नंदा राऊत, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या संचालक मीनल जोगळेकर उपस्थित राहणार आहेत.

## भुजबळ यांच्या पुढाकाराने राज्यभर विशेष शिबिरे

मुंबई (दैनिक संध्या) : अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री श्री छगन भुजबळ यांच्या पुढाकाराने माजी उपमुख्यमंत्री दिवंगत अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त २२ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत राज्यभर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे. या विशेष मोहिमेद्वारे राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना उपलब्ध इष्टांकाच्या मर्यादेत नव्याने शिधापत्रिका वितरित करण्यात येणार आहेत. शासनाचे विभाग अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान करण्याच्या उद्देशाने अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने हा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. 'एकही पात्र लाभार्थी अन्नसुरक्षा योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये' हा उद्देश समोर ठेवून पात्र लाभार्थ्यांचा राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेत तातडीने समावेश करण्यासाठी ही विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. २ जून २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त इष्टांकाची जिल्हानिहाय पुनर्रचना करण्यात आली आहे. त्यानुसार उपलब्ध इष्टांकाचा प्रभावी वापर करून २० जुलै २०२६ रोजी पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिका वितरित करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांना आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. या विशेष मोहिमेदरम्यान राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत पात्र लाभार्थ्यांकडून अर्ज स्वीकारणे, त्यांची तात्काळ पडताळणी करणे, पात्रता निश्चित करणे तसेच संबंधित जिल्ह्यास उपलब्ध इष्टांकाच्या मर्यादेत नवीन शिधापत्रिका मंजूर करून त्यांचे वितरण करण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. या मोहिमेमुळे पात्र लाभार्थ्यांना शिधापत्रिका मिळण्याच्या प्रक्रियेला गती मिळेल, उपलब्ध इष्टांकाचा प्रभावी वापर होईल आणि शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत अधिक वेगाने व प्रभावीपणे पोहोचण्यास मदत होईल. राज्यातील पात्र नागरिकांनी या विशेष शिबिरांचा लाभ घेऊन आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावेत, असे आवाहन अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले आहे.

जाहिरात संकलन : श्री. कृष्णमुर्ती जगताप, दैनिक संध्या - बारामती तालुका प्रतिनिधी



महाराष्ट्राचे दिवंगत उपमुख्यमंत्री, लोकनेते

## मा. अजितदादा पवार

यांच्या प्रथम जयंतीनिमित्त

विनम्र अभिवादन ...

अभिवादक

## बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्यादित, बारामती




नंदन पशुखाद्य कारखाना, माळेगाव बु. ता. बारामती, जि. पुणे फोन: 02112-222772, 254260 | Customer Care : 9545450035

**श्री. किशोर भगवानराव फडतरे** — चेअरमन

**श्री. पुरुषोत्तम शिवाजी गाढवे** — व्हाईस चेअरमन

• संचालक मंडळ •

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. संजय रामचंद्र कोकरे | श्री. पोपटराव सोमनाथ गावडे | श्री. संदिप हनुमंत जगताप | श्री. दत्तात्रय सदाशिव वाघे |
| श्री. संतोष मारुती शिंदे | श्री. राजेंद्र दत्तात्रय रायकर | श्री. श्रीपती शंकर जाधव | श्री. सतिश हरिश्चंद्र पिसाळ |
| श्री. संजय ज्ञानदेव देवकाते | श्री. प्रशांत दत्तात्रय खलाटे | श्री. शहाजी जिजाबा गावडे | श्री. बापूराव तुकाराम गवळी |
| श्री. संजय तुकाराम शेळके | श्री. नितिन विश्वास जगताप | श्री. सुशांत महादेव जगताप | सौ. शोभा गोरख जगताप |
| सौ. अमृता योगेश गारडे | श्री. संभाजी नारायणराव होळकर | श्री. कौस्तुभ शरदराव चव्हाण | श्री. महेंद्र रामचंद्र काटकर |

**श्री. डॉ. योगेश वामन राणे** — व्यवस्थापकीय संचालक

**श्री. अमोल बाबुराव चव्हाण** — उपमहाव्यवस्थापक (वित्त व लेखा)

सर्व दूध उत्पादक, सहकारी दूध संस्था व कर्मचारी वृंद

---



काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची जान असणारे व
काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची दखल घेणारे
लोकनायक...

## स्व. अजितदादा पवार

यांच्या प्रथम जयंती निमित्त

कोटी कोटी प्रणाम..!

आदरणीय दादा तुम्हाला आजही स्वर्गीय म्हणणे मनाला पटत नाही.
तुमची पहिली जयंती आहे, असे आजही वाटत नाही.

## विनम्र अभिवादन दादा..!

आपले नम्र

**श्री. युवराज हिरामण काकडे** — सभापती - पंचायत समिती हवेली, जिल्हा-पुणे.

**सौ. विद्या दत्तात्रय गायकवाड** — उपसभापती - पंचायत समिती हवेली, जिल्हा-पुणे.

**श्री. शेखर शेलार सो.** — गटविकास अधिकारी, पंचायत समिती हवेली

| | | | | |
|---|---|---|---|---|
| श्री. कृषीराज दत्तात्रय चौधरी<br>सदस्य: पंचायत समिती हवेली, पुणे. | श्री. अमोल त्रिंबक टेकाळे<br>सदस्य: पंचायत समिती हवेली, पुणे. | श्री. युवराज नारायण वांजळे<br>सदस्य: पंचायत समिती हवेली, पुणे. | श्री. कुशाल गोरख सातव<br>सदस्य: पंचायत समिती हवेली, पुणे. | श्री. सुदर्शन जयप्रकाश चौधरी<br>सदस्य: पंचायत समिती हवेली, पुणे. |
| सौ. सुषमा संतोष मुरकुटे<br>सदस्या: पंचायत समिती हवेली, पुणे. | सौ. कोमल गणेश कांबळे<br>सदस्या: पंचायत समिती हवेली, पुणे. | सौ. मोनिका श्रीकांत कंद<br>सदस्या: पंचायत समिती हवेली, पुणे. | सौ. राणी दत्तात्रय वाळके<br>सदस्या: पंचायत समिती हवेली, पुणे. | सौ. शुभांगी राजु खिरीड<br>सदस्या: पंचायत समिती हवेली, पुणे. |

---



दादा तुम्ही कायम
आमच्या स्मरणात असाल....



लोकनेते

## स्व. अजितदादा पवार

यांच्या जयंतीनिमित्त

विनम्र अभिवादन..!

## बारामती कृषी उत्पन्न बाजार समिती

बारामती, जि .पुणे

ऑफिस फोन नं.०२११२-२२२६७८ - २२२३३७-२२८४०८

E-mail-apmc.baramati@rediffmail.com www.apmabaramti.com App-apmcbaramati

स्मार्ट प्रकल्प अंतर्गत केलेल्या गुणांकना मध्ये महाराष्ट्र राज्यातील ३०५ बाजार समित्यांमध्ये बारामती कृषि उत्पन्न बाजार समितीचा पुणे विभागात प्रथम व राज्यात तृतीय क्रमांक.

### वैशिष्टये

१) शेतमालाची उघड लिलाव पद्धतीने विक्रीची सोय व शेतमालास योग्य बाजारभाव
२) इलेक्ट्रॉनिक वजनकाट्यावर लिलावापुर्वी शेतमालाचे वजन व त्याच दिवशी पेमेंटची सोय
३) लायसेन्सधारक मापाड्यांकडुन संपुर्ण शेतमालाचे चोख व पारदर्शक मोजमाप
४) बारामती मुख्य यार्ड व सुपे,जळोची उपबाजार येथे ६० व ४० टनी इलेक्ट्रॉनिक भुईकाट्याची सोय
५) बारामती मुख्य यार्ड व सुपे उपबाजार येथे अत्याधुनिक यांत्रिक चाळणीची सुविधा उपलब्ध
६) शेतमाल तारण कर्ज योजना- ३ % वार्षिक व्याज दराने स्वनिधीतुन कर्ज वाटप
७) ना नफा ना तोटा तत्वावर गांडुळ खत प्रकल्प विक्री दर रू. ६,०००/-
८) मुख्य यार्ड व उपबाजार येथे शेतकरी, व्यापारी व बाजार घटकांसाठी पेट्रोल पंपाची तसेच सुपे व जळोची उपबाजार येथे CNG पंपाची सोय.
९) मुख्य व उपबाजार आवारात बाजार घटकांसाठी RO फिल्टरचे शुद्ध पिण्याचे पाण्याची सोय.
१०) जळोची उपबाजार येथे भव्य सेलहॉल सह फळे व भाजीपाला मार्केटची उभारणी तसेच सर्व सोईनियुक्त जनावरे बाजार, शासकीय जनावरे दवाखाना तेथे एक्स-रे व ऑपरेशनची सुविधा.
११) जळोची उपबाजार येथे डाळींब, आंबा व भाजीपाला निर्यात सुविधा केंद्राची सोय व मॅग्नेट प्रकल्प
१२) मुख्य यार्ड येथे रेशीम कोष ई-नाम प्रणाली द्वारे संपुर्ण लिलाव ऑनलाईन व ई-पेमेंटची सोय, भारतात प्रथम आंतरराज्य व्यापार बारामती मध्ये सुरू झाला आहे.
१३) बारामती मुख्य यार्ड येथे कापुस मार्केट दि.०२/११/२०२२ पासुन दर बुधवार व शनिवार रोजी उघड लिलाव पद्धतीने सुरू

**श्री. हौसेराव रामचंद्र कोकरे** (प्रभारी सचिव) **श्री. अरुण गणपत सकट** (उपसभापती) **श्री. विनायक महादेव गावडे** (सभापती)

संचालक मंडळ

| | | |
|---|---|---|
| श्री.विश्वास तानाजी आटोळे | श्री.रामचंद्र शामराव खलाटे | श्री. सुनिल वसंतराव पवार |
| श्री. निलेश भगवान लडकत | श्री. बापुराव दौलतराव कोकरे | श्री. दयाराम सदाशिव महाडिक |
| श्री. सतीश सर्जेराव जगताप | श्री. दत्तात्रय शंकरराव तावरे | सौ. प्रतिभा दिलीप परकाळे |
| सौ. शोभा विलास कदम | श्री. शुभम प्रताप ठोंबरे | श्री. विशाल ज्ञानदेव भोडवे |
| श्री. युवराज कैलास देवकाते | श्री. मिलींद अशोक सालपे | श्री. संतोष पांडुरंग आटोळे |
| श्री. नितीन शंकर सरक | श्री. प्रमोद चंद्रकांत दुरगुडे, (सहा. निबंधक बारामती) | |

---

आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक मिळविलेले

## ज्ञानसागर गुरुकुल



डॉ. सागर मानसिंग आटोळे
संस्थापक - अध्यक्ष

आदरणीय उपमुख्यमंत्री

## स्व. अजितदादा पवार

यांच्या जयंती निमित्त

विनम्र अभिवादन!



विद्येचे माहेरघर समजल्या जाणाऱ्या पुणे शहरानंतर जिल्ह्यातील बारामती तालुका हा एज्युकेशनल हब बनत आहे. लाखो विद्यार्थी बारामती शहरात शिक्षण घेत आहे. याच बारामती तालुक्यात सावळ येथील ज्ञानसागर गुरुकुलची आंतरराष्ट्रीय पातळीवर दखल घेतली गेली आहे. गुणवत्तापूर्ण भारतीय संस्कृतीची जोपासना करत शिक्षण देणारी शाळा म्हणून ज्ञानसागरने नावलौकिक मिळवला आहे.



गुणवत्तापूर्ण शिक्षण, शीस्त, संस्कार व चारित्र्यसंपन्न नागरिक घडविणारी शाळा

शालेय शिक्षण विभागांतर्गत मुख्यमंत्री " माझी शाळा, सुंदर शाळा " या स्पर्धेत तालुक्यात द्वितीय क्रमांक

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उन्नतीसाठी ध्येयाने प्रेरित झालेले प्रा. सागर मानसिंग आटोळे सर (एमए, एमएड, डीएसएम व पीएचडी, पुणे) यांनी एक स्वप्न पाहिले वयाच्या २२ व्या वर्षी श्री हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केली. स्वप्न सत्यात उतरवण्यासाठी त्यांनी जन्म गावाची निवड केली. प्रयत्नांची पराकाष्टा केली. त्यांच्या या प्रयत्नाला यश मिळत गेले.

ज्ञानसागर इगुरुकुलची ख्याती देश पातळीवरच नाही तर जागतिक पातळीवर देखील दखलपात्र ठरली. जन्मगाव सावळ येथे वडिलांच्या जिरायती पाच एकर क्षेत्रावर शैक्षणिक संकुल सुरू करून त्याच्या चार ठिकाणी शाखा सुरू केल्या. त्यांच्या या प्रयत्नामुळे आज हजारो विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आले. उज्वल भविष्याचे स्वप्न पाहू लागले. गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या जोरावर ज्ञानसागर चे विद्यार्थी शिक्षण व क्रीडा क्षेत्रात देखील चमकले. कर्नाटक, राजस्थान, हरियाणा, दिल्ली, दक्षिण कोरिया व ऑस्ट्रेलिया अशा अनेक ठिकाणी पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेत विद्यार्थ्यांना सहभागी करून महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व या शाळेने केले. तालुका, जिल्हा, राज्य, देशपातळीवर पारितोषिके पटकविली. भारतीय संस्कृतीवर आधारित गुणवत्तापूर्ण शिक्षण व चारित्र्यसंपन्न भारतीय नागरिक घडवणे संस्थेचे उद्दिष्ट असल्याचे प्रा. सागर आटोळे सांगतात.



### शाळेच्या शिरपेचात विविध मानाचे तुरे







- ज्ञानसागर गुरुकुलची विद्यार्थिनी जान्हवी विरकर हिची भारतीय क्रिकेट संघात निवड.. ही गुरुकुलच्या दृष्टीने अभिमानाची बाब
- दक्षिण कोरिया मधीलआंतरराष्ट्रीय स्पर्धेत देशाचे प्रतिनिधित्व केलेले विद्यार्थी
- AI स्मार्ट पेनचा वापर करणारीपुणे जिल्ह्यातील पहिली शाळा

ज्ञानसागर ही शाळा २०१५ साली ISO ९००१ : २००८ मानांकन प्राप्त आहे. २०१६ मध्ये मलेशिया या ठिकाणी प्रा. सागर आटोळे सर यांना आदर्श संस्थाचालक पुरस्कार, २०१७ मध्ये नवी दिल्ली येथील एलाईट समिती टॉप स्कूल ऑफ इंडिया ॲवॉर्ड, २०१८ मध्यप्रदेशमध्ये प्रा. आटोळे सर यांना डायनामिक यंग प्रेसिडेन्स पुरस्कार मिळाला आहे. २०१९ मध्ये कर्नाटक येथील शिक्षण परिषदेत इंडिया स्टेट बोर्ड स्कूल ॲवॉर्ड २०२१ मध्ये मुंबईत राजभवन येथे राज्यपालांच्या हस्ते प्रा. आटोळे सर यांना आदर्श संस्था चालक पुरस्कार, २०२२ मध्ये उत्तर प्रदेशमधील आंतरराष्ट्रीय शिक्षण परिषदेमध्ये डिजिटल स्कूल ॲवॉर्ड मिळाला आहे. २०२३ साली शालेय शिक्षण व क्रीडा विभागअंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा' या स्पर्धेत तालुक्यात द्वितीय क्रमांक मिळविणारी शाळा व दक्षिण कोरिया व ऑस्ट्रेलियामध्ये देशाचे प्रतिनिधित्व करणारे ज्ञानसागरचे विद्यार्थी आहेत. ज्ञानाचा सागर म्हणजे ज्ञानसागर गुरुकुल.

**ADMISSION OPEN** NURERY To 12th std ( CBSE & SSC )

SAWAL, TAL. BARAMATI, DIST. PUNE 9764370109 / 9226880109 / 9764860109